CHARLOTTE MARATHI MANDAL

**रौप्य महोत्सवी वर्ष**

शार्लट मराठी मंडळ

मैत्र जिवा भावाचा, सोहळा मराठी अस्तित्वाचा !

25th ANNIVERSARY

शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत

# दीपतरंग

२०२५




## शुभ दीपावली

**दिवाळी सण मोठा - आनंदाचा,
एकोप्याचा, आणि आपल्या संस्कृतीचा!**

www.charlottemarathimandal.org

**नमस्कार मंडळी,**

**दीपांच्या सुवर्ण तेजात उजळली जीवनाची वाट,**
**आनंद,आपुलकी आणि उमेद यांचा चढला साज**
**ह्या साजिऱ्या  क्षणांत  मिसळला स्नेहाचा गंध,**
**घराघरांत झळकतो आज प्रेमाचा अनोखा आनंद.**
**ही दिवाळी, फक्त प्रकाशाची नाही,तर मैत्रीची आहे,आनंदोत्सवाची  परिभाषा आहे**
**एकत्र येऊन मराठी संस्कृतीच्या तेजात न्हाऊन निघण्याची मेजवानी आहे**

शार्लेट  मराठी मंडळा तर्फे तुम्हा सर्वांना  दिवाळीच्या अनेक शुभेच्छा

हा संदेश लिहित असताना आपला  नोव्हेंबर 8, 2025 चा दिवाळी सोहळाआनंदाने पार पाडवा म्हणून आम्ही सर्व मंडळाच्या  सदस्यांनी आणि आपल्या दिवाळी टीमने  खुप उत्सहाने तयारी केली  आहे .

चिमुकल्यांचे फॅन्सी ड्रेस प्रदर्शन,मराठी शाळेचा कार्यक्रम ,छोट्यांचे कलागुण प्रदर्शन ,मोठ्यांचे कलागुण प्रदर्शन, स्वर  संध्या हा आपल्याच शार्लेटच्या  कलाकारांनी  तयार केलेला सुमधुर गीतांचा  कार्यक्रम  असे अनेक  कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत. महत्वाचे म्हणूजे चहा, फराळ आणि जेवण सर्व तयारी जय्यत सुरु आहे ! आपण सर्व या मंगलमयी वातावरणात मंडळाची दिवाळी साजरी करूयात.

सद्य  कार्यकारिणीची ही तिसरी  दिवाळी आणि ह्या व इतर अनेक  निमित्तानी  परत परत आपल्या माणसांची सेवा करायची संधि मिळाली, व आनंद देण्याची  म्हणून आम्ही सर्व आभारी आहोत.

बोर्ड म्हणून आम्ही मे 2023 मध्ये मंडळाची सूत्रे हाती घेतली.,तेव्हा पासून अनेक उत्तम  यशस्वी कार्यक्रम आपण सगळ्यांनी साजरे  केले. वरिष्ठ नागरीकांसाठी उत्तररंग प्रोग्रॅम  ,शाळेच्या मुलांकरता स्टीम प्रोग्रॅम आणि दिवाळी 2023. त्यानंतर 2024 मध्ये मंडळाचा संक्रांत प्रोग्रॅम ,उंच माझा झोका ,वसंतोत्सव ,उत्तररंग आणि दिवाळी 2024 .

ह्या वर्षी मंडळाचे  25वे  वर्ष देखील आपण दिमाखदारपणे,उत्साहात व एकत्रितपणे साजरे केले आणि आता 2025ची दिवाळी  आपण एकत्र साजरी करणार आहोत….!!

त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येऊन 2025 च्या दिवाळीचा आनंद ऐकमेकांच्या भेटीगाठी आणि चहा, फराळ जेवण  करून साजरा  करुया, हिंच विनंती!

आमचा मुख्य उद्देश्य मंडळाला स्थिरता आणि सर्व लोकांसाठी योग्य वार्षिक सदस्यत्व आणि चांगल्या कार्यक्रमांच्यासह पुढील अध्यायात पदार्पण करणे हेच होतें आणि  ते सफल झाले आहे ते आपणा सर्वांच्या सहभागाने.

हे मंडळ आपले सर्वांचे आहे त्यामुळे आपण सर्व एकत्र येऊन ह्या  दीपतरंगच्या रंगात रंगून जाऊयात …!!!

आणि आनंदाने साजरा करूयात

"मैत्र जीव भावाचा  सोहोळा  मराठी अस्तित्वाचा "

जय महाराष्ट्र! जय शॉर्लेट !


**दीपक वेताळ (अध्यक्ष)**


**दीपा लिमये (उपाध्यक्ष)**


**मनिषा नाईक (सचिव)**


**सुनील मुंडले (खजिनदार)**


**आल्हाद शेवडे (विश्वस्त)**


**रणजित गुर्जर (विश्वस्त)**



**दीपा लिमये**

**संपादकीय**

नमस्कार शार्लेटकर मित्र मैत्रीणीनो,

आपणा सर्वांच्या घरची दिवाळी दिमाखात साजरी झाली असणार ह्याची खात्री आहे !!!
तेवढ्याच आनंदात आणि दिमाखात आता आपण आपल्या मंडळाची दिवाळी साजरी करायला जमत आहोत.

दिवाळी म्हणलं की आपल्या डोळ्या समोर येत ते सुंदर सजवलेलं घर आणि दारात काढलेली सुंदर रांगोळी, आकाश कंदील ,सुंदर पणत्या,खुसखुशीत फराळ आणि उत्तम दिवाळी अंक ! तर त्यातील बऱ्याच गोष्टींचा आनंद आपण घरी घेतलाच असणार, पण सामुहिक दिवाळी हा एक वेगळाच आनंद असतो.

मंडळाची दिवाळी हा एक उत्साहाचा सोहळा असतो,त्यात 2023 पासून पासून आपण दीपोत्सव " हा आपल्या मंडळाचा दिवाळी अंक, सुरु केला व त्यातून काही तरी वेगळं करण्याचे समाधान सगळ्यांना मिळाले .

आपणा सवाांच्या उत्तम प्रतिसादामुळे यंदाही आपण दिवाळी अंक प्रकाशित करीत आहोत. यंदाची दिवाळी आपण दीपतरंग "आपली संस्कृती आपला अभिमान"ह्या संकल्पनेवर अंधारून साजरा करीत आहोत!

दिवाळी अंकात उत्तम कविता ,कलाकृती,लेख व गोष्टी आहेत, त्याचा नक्की आस्वाि घ्या !! वर्ष भरात साजरे केलेले काही आनंदाचे क्षण,यंदाच्या आपल्या 25व्या वर्षाच्या सोहळ्याच्या आठवणी देखील ह्यात टिपले आहेत.

सर्व मंडळी ज्यांनी आपले लेख, कविता ,कलाकृती अंकासाठी देऊन सहभागी झालेत व सर्व प्रायोजक ज्यांनी जाहिरात देऊन हातभार लावला आहे हे त्या सर्वांचे आभार!
हा स्नेह असाच राहो ...!!!

आपणा सर्वांना दिवाळी व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!!!!!

दिवाळी अंक कार्यकारिणी : **नितीन विध्वंस , दीपा लिमये , सुभाष लिमये**

CMM दिवाळी अं क 2025

# योगदान

**संपादक**

दीपा लिमये

**दिवाळी अंक संपादक संघ**

नितीन विद्वांस

दीपा लिमये

मुखपृष्ठ: सुभाष लिमये

अंक सजावट: सुभाष लिमये

**विशेष आभार**

CMM मंडळ कार्यकारिणी

**कविता**

अभिजीत एकरे

अद्विक एकरे

महंतेश साळुंखे

पद्मिनी पटवर्धन

समीर चौधरी

सिद्धी श्रोत्री

सुप्रिया नाईकवाडी- भोर

Evannie Soman

वृषाली शेवाळे

**कलाकृती**

Arnav Kirkire

Avni Kirkire

Arav Khedkar

Sharvari Kulkarni

Bhargavi Jumde

Evannie Soman

Manaswi Bansod

**लेख**

नितीन विद्वांस

निशिकांत पटवर्धन

पद्मिनी पटवर्धन

सदाशिवा गोडबोले

समीर सावंत

सुरेशचंद्र वाघ

सौ. शैलजा गोगटे

श्रीमती अनुराधा चितळे

**रेसिपी**

रुपाली साळुंखे

**जाहिरातदार**

AKDA

Pandurang & Manisha Naik

Artemis Hair Salon and Spa

Vastu Realty

Copyright © 2025 Charlotte Marathi Mandal. All rights reserved.
Charlotte Marathi Mandal is a nonprofit organization 501(c) based in Charlotte, NC

No part of this document can be copied without a prior permission of the copyright owner.

ह्या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यामध्ये मांडलेले विचार, मते, व साहित्याची मांडणी ही सर्वस्वी ते साहित्य पाठवणाऱ्या लेखक वा लेखिकेची आहेत. संपादक मंडळ आणि CMM त्या विचारांशी सहमत असेलच असे नाही.

# Charlotte Marathi Mandal Silver Jubilee Celebration














































मैत्र जिवा भावाचा, सोहळा मराठी अस्तित्वाचा !

# Charlotte Marathi Mandal Sankranta 2025





























# दीपतरंग २०२५

# Poems

## जेव्हा मी नसेल तेव्हा..

कधी डोळे जर पाणावले तर
तुझ्या अश्रूंना स्वतः पुसून टाकशील.
दुसऱ्याने कुणी बघितले तर
ते त्याचा हिशोब करतील.

भावनांवर स्वार होऊन तुझ्या
नाजूक मनाचा कोपरा शोधतील.
किंमत तर कधीच कळणार नाही त्यांना
पण मोजण्याचा प्रयत्न नक्कीच करतील.

## माझी आई ,

छोटेसे घर , घरच्यांची स्वप्नं
तेच तिचे विश्व..
न गेली कधी हुरळून , अति आनंदाने
ना अश्रू वाया घालविले , दुःखाच्या डोंगराने.

फक्त शब्दानें नाही शिकविली
जीवनाची वाट....
स्थितःप्रद्ध राहून , न बोलून
शांतपणे बांधली सुखदुःखांची गाठ.

कितीही यश मिळविले तरी
सगळ्या समोर शाबासकी देण्याचा तिचा स्वभाव नाही .
क्षणिक समाधानामध्ये स्वतःला गुंतवून
खऱ्या आनंदापासून दूर जाण्यामध्ये तिचा विश्वास नाही.

तिच्यासोबत घालविलेला प्रत्येक क्षण
शिकवून आणि देऊन जातो खूप काही.
कितीही कठीण प्रसंग आले आणि गेले
तिचा आशीर्वाद तारतो मला प्रत्येक वेळी.

**कवी - अभिजीत एकरे**

## Me. Through My Own Eyes

No matter what I do
In their eyes, I'm never enough
They see me small
Like I'm just not tough.

But their reflections don't matter
It's mine that I need to see
When I look in the mirror
I want to be proud of me.

My own true satisfaction
It's not their applause or cheers
It's knowing I stood tall
Even with doubts and fears.

I won't let myself down
Not for their shallow soul
I'll hold my head high
winning them is not my goal.

## Life Is My Preacher

I didn't learn life with prayers and rules
No one told me "What's right, what's cruel"

I stumbled, I lost, I rose again
The failure taught me along with pain.

My lessons are scars, my book is The Street
Learnt from tough lessons, life feels complete.

**Poet – Advik Ekre, High School Junior**

## यात्रा

दुःखाच्या झळा , सुखाची सावली
तुमचाच प्रवास , तुमच्याच पावली

जुळलेले सूर,ऐकणारे कान
हसणारी तोंडं, फसलेली मान
रुसलेले थांबे, चुकलेल्या वाटा
धोक्याची वळणे आणि मोक्याचा फाटा

प्रवास तर गंधाचा नकाशे आणि अनुमान
चुकवणारा
पण मिजास कश्याला स्वछंदाची,
हा धोपट मार्ग पण स्वछंदाला हि लाजवणारा

शेवटी तुमचाच प्रवास, तुम्हीच यात्री
कश्याला पर्वा जगाची, ते फक्त सहयात्री

**महंतेश साळुंखे**

## The Ties That Bind Us

**To my grandchildren**

**By Padmini Patwardhan**

Your faces give me endless joy eyes sparkling,
tomorrow’s promise tumbling like falling rain
on a sun-kissed summer day your head resting
on my shoulder trusting, never demanding
listening, never commanding
*just being you.*

A flood of happiness mists unchecked from my
eyes a refreshing, soothing balm diffusing
boundaries of age as warmth spreads tender as
a blanket of smiles and I feel fierce joy inside
*just being me*.

We sit there in timeless harmony listening,
sharing life building bridges through our stories
mine scripted, yours unfolding past, present,
future joined in ties that bind us my spirit filled
with your innocence uplifted by your
effervescence you, my grandchildren, are the
reason I tell my story again with passion as we
wait for yours to be written
*just being us*.

© Padmini Patwardhan 2025
A version of this poem was published in
Contemplate on Medium



[Image generated with Google Gemini ai,
finished with Microsoft Designer by
Padmini Patwardhan]

# Artemis Hair Salon and Spa

Elevate your beauty routine at Artemis Hair Salon & Spa, where luxury meets expertise. Indulge in professional hair styling, rejuvenating facials, and spa therapies designed to restore balance and confidence Because you deserve to look and feel your absolute best.







- ***HAIRCUT & STYLING***
- ***HAIR COLOR, HIGHLIGHTS & TREATMENT***
- ***THREADING***
- ***TINTING***
- ***WAXING***
- ***MAKE UP, UPDO & SAREE DRAPPING***

**CALL US TODAY! FOR BOOK AN APPOINTMENT BEFORE SPOTS ARE TAKEN**

**(704) 619-4864**

***ATREMIS HAIR SALON 4 SPA***

8438 HENRY HARRIS RD, FORT MIL

# शार्लटची "पंचविशी"

बघता बघता वर्षे गेली ,आली मंडळाची  पंचविशी, मराठमोळ्या  चैतन्याची, नवलाई तर पहा कशी.

इवल्याशा त्या रोपट्याचा,  वृक्ष गेला उंच आकाशी, काय म्हणूनि पुसता आम्हास, नाते जडले मायबोलीशी.

कोण म्हणतो मंडळास, लागती फक्त पैसे अन् तिकीटं, संस्थेच्या निरंतर वाढीस, लागतं मायेचं उबदार दुपटं.

स्वयंसेवकांची ती धडपड,  विश्वस्तांची केवढी खटपट, प्रत्येक कार्य सिद्धीस नेणे,त्यासाठीच सगळी झटापट.

संक्रांतीच्या हळदीकुंकवात,  तिळगुळाचे भरुया ताट, पाडव्याच्या गुढीसमोर, श्रीखंडपुरीचा मस्त थाट.

शार्लटच्या गणेशोत्सवाला, "शिवस्य"चा थरथराट, मागून अलगद पावलांनी, येते मग दिवाळी पहाट.

नाटकांची मंदीयाळी,  कधी संगीताचा मेळा, दर रविवारी भरते,  बाल्यगणांची मराठी शाळा.

विज्ञानप्रदर्शन ते आमचे, लावी वर्तमानाशी लळा, उत्तररंगाच्या कार्यक्रमात, ज्येष्ठांचा भरुन येई गळा.

भांड्यास भांडे लागून कधी, उडालाच जर खटका, कोणी न लावून घेई, मनास आपल्या बिलकुल चटका.

कुटुंबकबिला मोठा, जणू गोड गार कुल्फीचा मटका, काहीही झाले तरी, फडकवू उंच आपला जरीपटका.

वर्षे अशी जाती किती, गणना त्यांची कोण करी, अशीच नेऊ  पुढे पताका, धुरा आमुच्या खांद्यावरी.

मायभूमी दूर जरी, निवास तिचा  सदैव अंतरी, ऋण तिचे मनी ठेवूनि, सुखरूप वाट पुढे ती सारी.

**समीर चौधरी**

# दिवाळी- अर्थातच दडलंय सारं (सार)...

उटण्याच्या सुवासाने दरवाळणाऱ्या सकाळी, अभ्यंगस्नानाचा मुहूर्त गाठण्यापासून ते फराळाचा आस्वाद आणि फटाक्यांचा आनंद
घेईपर्यंत; कळलंच नाही कधी साजरी झाली ही दिवाळी?
वध रावणाचा, कि मनातील वाईट विचारांचा?
दिव्यांच्या रोषणाईत श्री रामांचं परतणं, मनाचं तरीही, स्वदेशी साजऱ्या होणाऱ्या दिवाळीत गुंतणं...
दूर परदेशात येऊनही, आपल्या बांधवांना जोडणारी ही दिवाळी...
मोठी ती रोषणाई, पार्ट्या मोठ्या मोठ्या...
खऱ्या अर्थाने ही दिवाळी, साजरी होतीये का माझ्या सख्या?
वसुबारसेची सुरुवात, होते गौमातेच्या पूजेने...
कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी, फक्त मिळते का या निमित्ताने?
वसुधेच्या संवर्धनासाठी, पाऊल उचलण्याचे धोरण,
घेऊया हाती जोमाने...
त्याच निमित्ताने सेवा घडेल, आपल्या हातून नेमाने...
आली धनत्रयोदशी, करू पूजा धन्वंतरीची..
निरामय जीवनासाठी, करू प्रार्थना आरोग्य देवतेची...
आरोग्याहून मोठं दुसरं धन नाही, देवाला साकडं घातलं तरी,
मिळणारं काही हे फळ नाही...
अनारोग्यापासून आरोग्यापर्यंतच्या, प्रवासाची सुरुवात करूया आज,
शिस्त आणि व्यायामाची घालून सांगड, होऊया जागृत आज...
मग येतो तो दिवस नरकचतुर्दशीचा, विनाश असुराचा.. नरकासुराचा...
आज हा नरकासुर दिसत नसेल डोळ्याने, वसतो अनेकांच्या मनी अनावधानाने...
वेळात वेळ काढून मग, समजूया आपल्या मनाला...
इथे तिथे न शोधता, मारूया आधी अंतर्मनातल्या असुराला...

# दिवाळी- अर्थातच दडलंय सारं(सार)...

लक्ष्मीपूजनाला जमली, मंडळी सारी घरातली...
तोरणं दारी, लगबग भारी, तेजोमय करणारी, आली दिवाळी...
नावाप्रमाणे होणारे, लक्ष्मी पूजन हे असते धन-संपत्तीचे...
साजरी करूया ही दिवाळी, बंध जोडून श्रीमंत मनांचे...
बलिप्रतिपदेच्या दिवशी, बळीराजाच्या कहाणीने समजूया जीवनातील मर्म...
हव्यास आणि समाधानाच्या शर्यतीत, विसरत चाललोय दानधर्म...
धनाचे नाही रे.. साध्या विद्यादानाने, पदरात पाडूया थोडेसे कर्म...
मग वेळ नका दवडू, करावया हे सत्कर्म...

दिवाळीचा खरा अर्थ, समजूया मग आता, घेऊन वसा ज्ञानाचा अणि बंधुत्वाचा...
आशीर्वचन देवो सदा विधाता, प्रेरणादायी ठरतील अलौकिक या गाथा...
प्रेरणादायी ठरतील अलौकिक या गाथा...

**सिद्धी श्रोत्री**

## मानवता हा एकच धर्म

माणसांनी बनतो हा समाज
या समाजाचं आपण काही देणं आहे ,
प्रेम आपुलकी आणि जिव्हाळा
हीच या माणुसकीच्या धर्माची शिकवण आहे ..
बंधन पाळणारा ही हाच समाज
अन तोडणाराही हाच समाज आहे ,
पण त्याहून आपल्याला जगायला शिकवणारा
माणुसकी हा एकमेव धर्म आहे ..
देशात होऊन गेले अनेक थोर दिग्गज लोक
आपण फक्त त्यांना अनुसरत आहे,
थोडा विचार करून तर बघा बर
की खरच काय त्यांचे विचार आपल्या
आचरणात आहे ..
आतापर्यंत फक्त माझ मी आणि तुझ तू
एवढच करूनच आपण जगत आहे ,
या थोर दिग्गजांची शिकवण आचरणात आणून
आता एकत्र येऊन आपण म्हणण्याची गरज आहे ....
जात धर्म प्रांत , भाषा सोडून
आपआपसात नातं घट्ट विनायचं आहे,
तोडून साऱ्या रुढी परंपरा
एकमेकांशी माणूस म्हणून आता वागायच आहे
आता इथून पुढे या माणुसकीच्या वाटेवर
एकत्र आपण चलायचं आहे ,
जिथे एक जण जरी अडखळला
तिथे दुसऱ्याने हात धरून साथ करायची आहे ...

## नवीन नात्याची सुरवात

अपुऱ्या पडलेल्या शब्दांमूळे डोळे बोलके होतात,
न उलगडणारे कोडे अलगद उघडून ठेवतात,
कधी कमी, कधी जास्तच बोलून जातात,
आणि नकळत नवीन नात्याची
सुरवात करुन देतात...
कधी हसत, कधी गप्प राहूनही जवळ येतात,
स्वप्नांच्या रंगांनी आयुष्याचे क्षण सजवतात,
मनामनांत आनंदाचे पूल बांधून जातात,
आणि नकळत नवीन नात्याची
सुरवात करुन देतात...
मनातल्या शांत लहरी जेव्हा एकत्र येतात,
तेंव्हा शब्दांपलीकडच्या भावना जागतात,
क्षण न क्षण स्पर्शासारखे भासून जातात,
आणि नकळत नवीन नात्याची
सुरवात करुन देतात...
काळाच्या ओघात क्षण हे आठवणी बनतात,
मनात साठवलेले शब्द पुन्हा उमलतात,
नजरेतून नजरेत जिव्हाळ्याचे सूर मिसळतात,
आणि नकळत... त्या भावनांमधूनच
एक सुंदर नात्याची सुरवात करुन जातात...

## मुलगी म्हणजे काय असते

मुलगी म्हणजे काय असते
आईचे दुसरे रूप असते,
संसाराच्या वेलीवर फुललेले
नाजूक असे फुल असते...

सुंदर निरागस हसणारा,
कधीही न आटनारा झरा असते,
छूम छूम करत फिरणार,
आयुष्याला रंग देणार गीत असते...

हसून सगळ्यांच मन जिंकणारी
नाजूक अशी बाहुली असते ,
संकटाच्या प्रसंगी मात्र
झाशीच्या राणी पेक्षा कमी नसते...

स्वप्नांना नवे पंख देणारी
आशेची ज्योत पेटवणारी असते,
प्रत्येक घर उजळवणारी,
तीच तर पणती असते...

## समुद्राच्या प्रत्येक येणाऱ्या लाटेनिशी

समुद्राच्या प्रत्येक येणाऱ्या लाटेनिशी
आठवण तुझी गडद होते,
माझे न बोलता ही तुला समजणे
नव्याने तुझी ओढ लावून जाते...

कितीही समजावले भावड्या मनाला
तरी गुणगान तुझे गातच राहते,
अडकुनी एका क्षणी तुझ्या नजरेत
मग मी माझीच ना उरते...

रात्रभर ताऱ्यांशी बोलताना
नाव तुझंच ओठांवर येते,
थंड वाऱ्याच्या झुळुकीत सुद्धा
तुझ्या स्पर्शाचं भास होतं राहते...

कधी हास्यांत, कधी दुःखात
तुझीच छबी नजरेसमोर येत राहते,
आठवणींच्या त्या सागरात
मन माझे पुन्हा पुन्हा हरवते....

**सुप्रिया नाईकवाडी- भोर**

# A Red Rose

I am a rose
Red as blood, and petals soft as silk
I may be beautiful, but I am stuck
I cannot fly, swim, walk, run, or gallop

How wonderful it would be to move?
It would be sheer joy!

But I have learned to love myself, and so should you.
Be grateful that you have gotten the chance,
The chance to move, to breathe, to live!

**Evannie Soman**

## प्रयत्नांती परमेश्वर

जेव्हा टाकशील तू पाऊल प्रगतीकडे
तयार होतील काटे तुझ्या चोहीकडे .....
काट्यांना घाबरशील तर संपशील

टोचू दे काट्यांना सहनशीलतेपलीकडे .....
धैर्य ठेव ,साहस ठेव हार मानू नकोस
बोलणाऱ्यांना बोलू दे, तुझं काम सोडू नकोस.....

सहजच मिळत नसत यश
अपयशांना घाबरून जाऊ नकोस ....

धाडसी तर तू आहेसच
तुझ्यातली जिद्द आता सोडू नकोस .....

चालत राहा तुझ्या ध्येयाकडे मागे वळून पाहू नकोस
स्वप्नांना तुझ्या असं सहज तुटू देऊ नकोस .....

प्रयत्न करत राहा खचून जाऊ नकोस
प्रयत्नांती परमेश्वर हे विसरुन जाऊ नकोस ......

**वृषाली शेवाळे**

WISH YOU A VERY HAPPY DIWALI

# AKDA ASHWINI KATHAK DANCE ACADEMY

## WHAT IS KATHAK

KATHAK IS A NORTH INDIAN CLASSICAL DANCE WHICH IS ACCOMPANIED BY HINDUSTANI CLASSICAL MUSIC. KATHAK ORIGINATED AS A STORY TELLING TRADITION, KATHAK HAS EVOLVED OVER TIME INTO A PERFORMING ART KNOWN FOR GRACEFUL HAND MOVEMENTS AND PIROUETTES, AND SCINTILLATING FOOTWORK.

## TEACHING EXPERIENCE

ASHWINI HAS BEEN TEACHING AND PERFORMING KATHAK PROFESSIONALLY FOR 20+ YEARS. SHE MOVED TO CHARLOTTE IN 2010 AND ESTABLISHED AKDA IN BALLANTYNE AS THE FIRST DEDICATED DANCE STUDIO FOR KATHAK. ASHWINI OFFERS TRADITIONAL INSTRUCTION IN KATHAK IN THE GURU-SHISHYA PARAMPARA. AKDA IS AN ACCREDITED EXAM CENTER FOR BHARATI VIDYAPEETH OFFERING CERTIFICATE AND DIPLOMA LEVEL EXAMS IN KATHAK.

## WHO IS ASHWINI

IN ADDITION TO BEING AN EXCELLENT AND EXPERIENCED TEACHER, ASHWINI IS AN ACCOMPLISHED PERFORMING ARTIST, DANCER AND CHOREOGRAPHER WITH NUMEROUS AWARDS AND ACCOMPLISHMENTS TO HER CREDIT IN DANCE, DRAMA AND ACTING BOTH ON STAGE AND IN MOVIES. SHE BELIEVES PASSIONATELY IN CARRYING FORWARD TO THE NEXT GENERATION THE TRADITION OF KATHAK AND BUILDING ON THE LEGACY PASSED TO HER BY HER GURUS. SHE LEARNED KATHAK FROM THE AGE OF 13 FROM GURU AMALA SHEKHAR A SENIOR DISCIPLE OF GURU PANDITA ROHINI BHATE. SHE WAS SELECTED TO BE PART OF GURU PANDITA ROHINI BHATE'S PERFORMING TROUPE WHILE STUDYING IN PUNE. IN 2000 SHE MOVED TO LEXINGTON KY AND CONTINUED TO TEACH AND PERFORM PROFESSIONALLY. SHE CONTINUES HER KATHAK TRAINING UNDER GURU MANEESHA SATHE AND HAS PERFORMS EXTENSIVELY HERE IN THE US AND INTERNATIONALLY.

## BV AFFILIATION

AKDA IS RECOGNIZED BY BHARATIYA VIDYAPEETH UNIVERSITY OF PUNE AS AN ACCREDITED EXAM CENTER. ASHWINI IS A CENTER DIRECTOR FOR BV IN NORTH AMERICA. STUDENTS FROM AKDA AND OTHER DANCE SCHOOLS ARE ABLE TO TAKE CERTIFICATION EXAMS IN KATHAK UP TO DIPLOMA LEVEL/ASSOCIATE DEGREE HERE IN CHARLOTTE.



859-806-4173

EMAIL - KATHAK@ASHWINIGOGATE.COM

WWW.ASHWINIGOGATE.COM

/ASHWINIKATHAK

## शिवस्य ढोल-ताशा पथक, शार्लट, नॉर्थ कॅरोलिना

शिवस्य - वाद्य संस्कृतीचे जतन :

शिवस्य ढोल-ताशा पथक ही शार्लट, नॉर्थ कॅरोलिना येथील एक  नावाजलेली सांस्कृतिक संस्था.

ढोल, ताशा या पारंपरिक वाद्यां बरोबरच लेझीम, गौंग, झांज,तुतारी या सारख्या निरनिराळ्या वाद्यांची भर पथकाची शान वाढवतात.

ढोल-ताशा आणि नुकत्याच जोडल्या गेलेल्या लाठी-काठी या परंपरागत कलाकृतींचे प्रशिक्षण देतात.

"ढोल-ताशाच्या तालावर, नाचते मराठी मन,

"पारंपरिक सांस्कृतिक, एक सुंदर बंधन

"नवीन पिढीला शिकवी कला आणि वारसा,

"लाठी काठी, शिवगर्जना वाढावी स्वसंरक्षणचा भरवसा"

"पारंपरिक वेशभूषा, सजावट, अन् खेळाचे रंग,

"मराठी संस्कृतीचे जणू मनी उठवी तरंग"







पथका चे कार्यक्रम केवळ संगीत आणि नृत्य सादर करत नाहीत तर त्यात परंपरागत वेशभूषा, सजावट आणि खेळ, यांचा समावेश असतो. यामुळे मराठी संस्कृतीची समृद्धता आणि विविधता जगासमोर उभी राहते.

शिवाय पथकच्या प्रयत्नांमुळे अमेरिकेतल्या मराठी तरुण पिढीला आपल्या मूळ संस्कृतीचा अभिमान वाटतो आणि ते आपल्या वारसाचे रक्षण करण्यासाठी प्रेरित होतात.

"शिवस्य" नावातच एक वेगळा रुबाब,एक दरारा. दुरुन नक्कीच तो दरारा जाणवतो मात्र एकदा का तुम्ही त्यात सहभागी झालांत की मग मात्र जाणवतो तो मायेचा ओलावा जो आपल्याला आपल्या मातीशी, परंपरेशी जोडून ठेवायला मदत करतो. शिवस्य अर्थातच भारतीय संस्कृती,परंपरा आणि सामाजिक जाणीव यांचा अनोखा मेळ.

दहा वर्षांपूर्वी (2013 सालि) पहिल्यांदा प्रमोद दादा (Pramod Hole) यांनी शिवस्य ची मुहूर्तमेढ रोवली. त्यांना त्यात भक्कम साथ मिळाली ती प्रताप दादा (Pratapsing Patil) यांची. या सह सुनील मुंडले,महेश भोर, जितेंद्र हिरेमठ,भूपेश पत्की,राहुल गरड इ. अशी बरीच नावे घेता येतील.अनेक जण आहेत. इतर सभासद ही अतिशय हिरीरीने सर्व कामांमध्ये  सहभागी होतात. प्रत्येकाचे योगदान हे तितकेच महत्त्वाचे. सुरुवातीला बोटांवर मोजण्याइतकी असणारी सदस्यांची संख्या आज  शंभरावर गेली आहे.

# शिवस्य ढोल-ताशा पथक, शार्लट, नॉर्थ कॅरोलिना

"जपता वाद्य संस्कृतीची परंपरा"

" शिवस्य पथकाच्या हाती देऊनी धुरा"

"पाहुनी मराठी मनाचा जल्लोष खरा "

"ऐकुनी शिवगर्जना रोमांचित धरा "

"परदेशी जनता करी शिवरायांना मानाचा मुजरा"





शिवस्य पथक म्हणजे परिश्रम अथक असे नव्हे पण ही सर्व मंडळी स्वतःल शिवरायांचे मावळे समजून पथकाची कामं अविरतपणे करीत असतात. पथकाने आपले अस्तित्व मोठ्यांपर्यंत मर्यादित न ठेवता लहान मुले, तरुण मंडळी सर्वांना संधी दिली आहे. नवीन पिढीला योग्य मार्गदर्शन करुन त्यांच्यातील कला गुणांना योग्य प्रकारे वाव देण्याचा पथकाचा कल असतो.

लाठी काठी, शिवगर्जना या पारंपरिक कला आणि प्रात्यक्षिके मुख्यत्वे नवीन पिढी सादर करते.

शिवस्य पथक गणपती विसर्जन,गांधी जयंती या सह Festival Of India, Harrisburg Multicultural event इ. निरनिराळ्या कार्यक्रमांमध्ये आपली एक वेगळी छाप सोडतात. फक्त पारंपरिक ढोल (Traditional) न वाजवता Western beats addition करुन Fusion करतात . हे सर्व करताना मुलांमध्ये सामाजिक बांधिलकी, जबाबदारी आणि भावना रुजवण्या साठी पथकाकडून बरेचदा शिवजयंती निमित्त गरजू (Homeless) लोकांसाठी "Food Drive"  या सारख्या योजना राबविल्या जातात. तसेच मुलांना हे सर्व करताना शैक्षणिक क्षेत्रातही आपल्या या सहभाग साठी volunteering hours मिळतील याचीही खबरदारी घेतली जाते.

" जुन्या पिढीला परंपरा जपण्याचा ध्यास"

" नव्या पिढीला यशाची उन्नतीची आस"

"त्याकरिता धरावी संस्कारांची कास"

मला शिवस्य पथक हे एखाद्या यज्ञा सारखे वाटते.





यज्ञाद्वारे मोठमोठी कार्य सिद्धीस नेता येतात ही पूर्वापार चालत आलेली परंपरा. या परंपरेप्रमाणे सर्वांना सहभागी करत, अडचणींवर मात करत, न खचता, लोककल्याणकारी प्रकल्प म्हणजे आजच्या पिढीच्या भाषेत एखादे complicated Project or Mission पूर्ण करणे.

अशा या पथकाला पुढील यशस्वी घोडदौडी साठी खूप शुभेच्छा.

शार्लट मराठी मंडळ

# मराठी ग्रंथालय

पुस्तकांच्या गावाला जाऊया, वाचक संस्कृती वाढवुया.

आपल्याला माहिती आहेच की गेले अनेक वर्ष CMM मराठी ग्रंथालय उपक्रम चालवत आहे. खऱ्या अर्थानं आपलं जगणं समृद्ध आणि संपन्न करण्याचं काम ग्रंथ म्हणजेच पुस्तकं करत असतात. पुस्तकं वाचण्यासाठी कुठल्या वेळेचं आणि वयाचं बंधन नसतं.

शार्लटला आलं म्हणजे पुस्तकांच्या गावाला आल्याचा ओलावा द्यावा म्हणूनच खास आपल्यासाठी हाकेच्या अंतरावर "शार्लट मराठी मंडळानी" ही पुस्तकं उपलब्ध करून दिली आहेत. तुम्हाला हवं असलेलं पुस्तक https://charlottemarathimandal.org/library या संकेत स्थळावर जाऊन शोधा आणि अर्ज भरुन द्या म्हणजे ग्रंथालयाचे स्वयंसेवक तुम्हाला संपर्क करून ते पुस्तक वाचनासाठी उपलब्ध करून देतील. विविध विषयांवरील 500+ पुस्तकं आपल्याकडं उपलब्ध आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त या सुविधेचा लाभ घ्यावा आणि खऱ्या अर्थानं मराठी संस्कृती जपण्यासाठी हातभार लावूया.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला पण हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी मराठी बोलूया आणि मुख्य म्हणजे मराठी वाचूया.

धन्यवाद,

शार्लट ग्रंथालय समिती

# दीपतरंग २०२५

# Articles

# मराठी अभिवाचन आणि लेखन कार्यशाळा

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी ।।

आमच्या शार्लट शहरातील मराठी मंडळ आपल्या मराठी भाषेच्या उन्नतीसाठी वेगवेगळे उपक्रम दरवर्षी करत असते. शहरात मराठी मंडळाचे वाचनालय आहे. गेली अनेक वर्षे मिलिंद बनसोडे अगदी नेटाने हे वाचनालय चालवत आहे. वाचनालयात 500 पेक्षा जास्त पुस्तके आहेत आणि वाचनालयाने आपला असा खास वाचकवर्ग निर्माण केला आहे . आपल्या वाचनालयातर्फे एक अभिवाचनाचा कार्यक्रम करूया असे मिलिंदचे बऱ्याच महिन्यांपासून म्हणणे होते. मंडळाच्या इतर कार्यक्रमांमुळे हा कार्यक्रम कधी करता येईल याबद्दल बरीच चर्चा झाल्यावर सगळ्यांना सोयीस्कर अशी तारीख 19 जुलै आणि वेळ संध्याकाळी 4-7 ही ठरली. मंडळाचे अध्यक्ष दिपक वेताळचे आशीर्वाद मिळाले आणि गाडी पुढे सरकली. अजून काय वेगळे करता येईल याची चर्चा आमच्या शहरातील प्रसिद्ध लेखिका मोहना जोगळेकर यांच्याबरोबर केली आणि अभिवाचनाबरोबर एक मराठी लेखन कार्यशाळा करुया असे ठरले. नवीन लेखकांना प्रोत्साहन मिळावे तसेच इतर लेखकांना एकमेकांशी चर्चा करता येईल हा उद्देश होता.

जूनच्या पहिल्या आठवड्यात कार्यक्रमाच्या तयारीला सुरुवात झाली. मी नावनोंदणीसाठी Google अर्ज (Form) बनवला आणि हिंदू मंदिरातील एका खोलीचे (Conference Room) आरक्षण केले. आमच्या मंडळातील सदस्य महेश भोरने एक मस्त फ्लायर बनवून दिले आणि विविध WhatsApp कट्ट्यांवर (Group) तसेच फेसबुकवर कार्यक्रमाची जाहिरात केली. जुलै 18 पर्यंत नावनोंदणी सुरु होती आणि बघता बघता 12 लोकांनी लेखन कार्यशाळेसाठी नाव घातले. या दरम्यान अभिवाचक जमवण्याचे आणि काय वाचन करायचे हे ठरवण्याचे काम मोहनाने पार पाडले. वेगवेगळ्या लेखक/लेखिकांचं आणि वेगवेगळ्या प्रकारचे (ललित, भयकथा, प्रवास वर्णन इ.) साहित्य वाचायचं असे नक्की झाले. मोहनाबरोबर मिलिंद, प्रज्ञा आपटे आणि गीता सुळे देखील अभिवाचन करतील असे ठरले.

अखेर कार्यक्रमाचा दिवस उजाडला. मी तयारीसाठी थोडा लवकर दुपारी 3 वाजता हिंदू मंदिरातील Conference Room मध्ये पोचलो. माझ्या आधीच मोहना हजर होती. भर ऊन्हाळ्याचे दिवस असल्याने बाहेर रणरणते उन आणि Conference Room मधील तापमानही 80 च्या वर दाखवत होते. AC चालू करायचा प्रयत्न केला पण बरीच खटपट करुनही AC चालू होईना. मंदिराशी संपर्क साधल्यावर कळले की त्यांनी AC दुरुस्ती करणाऱ्याला सांगितले आहे पण तो कधी येईल माहित नाही. आमच्या सुदैवाने आम्हाला दुसरी खोली देण्यात आली जिथे AC व्यवस्थित चालू होता. हळूहळू सर्व अभिवाचक आणि कार्यशाळेत नावनोंदणी केलेले लोक आले आणि थोडा उशीरा का होईना पण 4:30 ला कार्यक्रम सुरु झाला. पहिल्या भागात चौघांचे अभिवाचन, आणि मध्यांतरानंतर दुसऱ्या भागात लेखन कार्यशाळा असे स्वरुप होते.

अभिवाचनात वेगवेगळ्या प्रकारच्या चार कथा व ललित साहित्य निवडले होते. प्रज्ञाने सुरवातीला रत्नाकर मतकरींच्या एक भयकथेचे वाचन केले. या कथेचा नायक आरश्यातील स्वतःच्या प्रतिमेशी संवाद साधतो. कथा समजायला थोडी कठीण होती पण प्रज्ञाने त्याचे उत्तम सादरीकरण करुन त्यात रंग भरले. त्यानंतर मिलिंदने सांगीतलेल्या प्रवास वर्णनाची नायिका ही एक ऐश्वर्यात राहणारी ब्रिटनची महिला आहे. ती भारतीय महाकाव्य रामायणाच्या प्रेमात पडते आणि मग ती आपले घरदार मागे सोडून ज्या ज्या ठिकाणी रामायणातील घटना घडल्या त्या त्या ठिकाणांची सफर सायकलवर जिद्दीने पार पाडते. दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर सायकल वरून केलेल्या सफरीचा चित्तथरारक अनुभव म्हणजे ही कथा. त्यानंतर मोहनाने स्वतःच लिहिलेली Chopt ही विनोदी कथा वाचली. मोहनाची मुलगी Chopt नावाच्या एका Restaurent मध्ये काम करत असताना मोहना आपल्या कुटुंबासह तिथे जेवायला जाते आणि मग काय गमती घडतात याचे मस्त विनोदी वर्णन होते या कथेत. शेवटी गीता यांनी स्वतःच लिहिलेली मनाची नांगरणी ही कथा वाचली. सर्वच अभिवाचकांनी अनेक दिवस भरपूर परिश्रम घेऊन तयारी केली होती याची जाणीव झाली आणि त्यांनी केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणाला सर्व उपस्थितांनी खूप दाद दिली.

# मराठी अभिवाचन आणि लेखन कार्यशाळा

छोट्याशा 10 मिनिटांच्या मध्यांतरानंतर लेखन कार्यशाळेला सुरुवात झाली. प्रथम मोहनाने सर्वांना कार्यशाळेचे स्वरुप सांगितले. लेखन कार्यशाळेसाठी मोहनाने रहस्य, भय, प्रेम, बाल, लघु, शतशब्द कथा, ललित, कविता असं लिहिलेल्या चिठ्या बनवून आणल्या होत्या. प्रत्येकाला जी चिठ्ठी येईल त्याने त्याप्रकारचे लिखाण करायचे. अजून एक अट होती कि प्रत्येकाच्या लेखात गाव , घर, आरसा आणि खिडकी हे चार शब्द आलेच पाहिजेत. 15 मिनिटात लिखाण पूर्ण करायचे होते आणि नंतर प्रत्येकाने आपले लिखाण वाचायचे आणि त्यावर एकत्र चर्चा करायची व त्यावर मोहनाचे मार्गदर्शन असे ठरले.

15 मिनिटे बघता बघता संपली. मी वेळेअभावी फक्त लेखाची रुपरेषा व काही मुद्दे काढू शकलो. लेख किंवा कथा लिहिणे आणि त्यातही लोकांना आवडेल असे लिहिणे हे वाटते इतके सोपे नाही याची मला जाणीव झाली. माझ्यासारखीच थोडीफार परिस्थिती इतर काही जणांचीही होती कारण इतर काही लोकही नवशिकेच आणि कधीही लिखाण न केलेले असे होते. मात्र आमच्यातील काही लोक मात्र पूर्वी लिखाण केलेले होते आणि त्यांचे लेख चांगले झाले. चर्चेदरम्यान मोहनाने लिखाणाचे वेगवेगळे प्रकार, व्याकरणाचे नियम व लोकांना आवडेल असे रंजक कसे लिहावे यावर विस्तृत माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी मोहनाने सर्वांना गृहपाठ दिला, तो म्हणजे आम्ही उरलेले लिखाण नंतर काही दिवसात पूर्ण करुन Whatsapp ग्रुप वर पाठवायचे.

सर्व उपस्थितांना अभिवाचन तसेच लेखन कार्यशाळेचा कार्यक्रम खूप आवडला आणि वर्षातून एकदा तरी असा कार्यक्रम झालाच पाहिजे असे सर्वांचे मत पडले. मोहना तसेच सर्व अभिवाचकांना आभार व्यक्त करुन आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

**नितीन विद्वांस**

# शब्दांच्या पलीकडले

त्या दिवशी सकाळी दहा-साडेदहाच्या सुमारास मी नेहमी प्रमाणे हातात चहाचा कप घेऊन आमच्या बाल्कनीतून चहाचा आनंद उपभोगीत होते. मासे जसे थोड्या थोड्या वेळाने पाण्याबाहेर येऊन मोकळा श्वास घेतात तसेच मीही सकाळची धकाधकीची कामे उरकली की बाल्कनीत येऊन मोकळा श्वास घेत चहाचा आस्वाद घेत असते. त्या दिवशीही नवर जी लंच टाइमला घरी जेवायला येतो म्हणाले म्हणून भराभर अगदी साग्रसंगीत स्वैपाक उरकला अन् मग वरण-भाताचा कुकर गॅसवर चढवून बाल्कनीत येऊन चहा पीत उभी होते.आमच्या कॉलनीतल्या रस्त्यावर रोजचीच वाहनांची अन् माणसांची ये-जा सुरु होती. अचानक एक काळी फियाट झोकदार वळण घेत आमच्याच बिल्डिंगपाशी थांबली, कारचा मागचा दरवाजा उघडला अन् त्यातून माझी शाळा-कॉलेज पासूनची माझी मैत्रीण शरयू जोशी घाईघाईने उतरुन बहुतेक माझ्याकडेच यायला निघालेली मला दिसली.शरयूचा चेहरा मला किंचित घाबरलेला - अस्वस्थसा दिसला म्हणून मी बाहेरचे माझे दार उघडून दारातच तिची वाट पहात थांबले. लिफ्टने वर यायला तिला पाच-सात मिनीटेच लागली पण तेवढा वेळही माला अस्वस्थ करुन गेला. शरयू घरात शिरताच तिने धाडकन दार लोटून दिले अन् माझ्या गळ्यात पडून ढसाढसा रडायलाच लागली .

अग शरु? काय झालं गं? मी तिच्या पाठीवरुन हात फिरवत विचारलं. “अगं शनाया शनाया ..... "

" क --काय झालं काय शनायाला ? मी अस्वस्थ स्वरातच विचारलं "अग दोन दिवसांपूर्वी शनाया दोन्ही मुलांना अन सामान घेऊन घरी येऊन राहिलीय..... नवऱ्याला डिव्होर्सची नोटीस देऊन आलीय म्हणतीये आणि परत त्याच्याकडे जाणारच नाही असही म्हणतीये ..!!! शरयूने अर्धवट रडतच उत्तर दिले.... क-काय ? अग पण पंधरा वर्ष होऊन गेली आहेत ना लग्नाला तिच्या..? सतरा वर्ष झाली आहेत - मोठा जयेश तिचा बारावीत गेलाय अन् धाकटी रिया दहावीत जाईल आता. अग पण मग एवढं झालय तरी काय ? आणि लव्ह मॅरेज ना ग तिचं ? बर सासू-सासरे- नणंद कुणी नाहीच न तिला? मग नवऱ्याच काही लफडं वगैरे तर नाही नं ?मी एकामागोमाग एक प्रश्नांची सरबतीच सुरु केली होती तिच्यावर अन् मग मला वाटत माझ्या इतक्या सगळ्या प्रश्नांनी घाबरून अन् दमून गेल्यागत होऊन शरयू मट्कन सोफ्यावर जाऊन बसली अन् मग मीही तिच्याजवळ जाऊन तिची पाठ थोपटत राहिले.......

शरयू अनू माझी मैत्री अगदी शाळा-कॉलेजपासूनची,आम्ही दोघी एकाच कॉलेजात म्हणजे पुण्याच्या एस .पी कॉलेजात शिकलो.

शरयूने बारावी नंतर सायन्स घेतले अन् ती केमिस्ट्री घेऊन एम एस्सी झाली. मी मात्र सायकॉलॉजीत एम ए केले. लग्नानंतरही आम्ही दोघी पुण्यातच असल्याने आमची मैत्री कायमच घट्ट होत राहिली. शरयू एस पी कॉलेजम् मध्येच लेक्चरर म्हणून लागली तर मी पुण्यातल्या एका मोठ्या शाळेत समुपदेशक म्हणून काम करायला लागले. मला आठवड्यातून फक्त तीन दिवस काम असायचे त्यामुळे मी बऱ्यापैकी घरात गृहिणी बनून असायचे. शरयू मात्र हेड ऑफ डिपार्टमेंट असल्याने प्रचंड बीझी असायची.

शनाया शरयूची एकुलती एक मुलगी- पहिल्यापासून एकटीच असल्याने स्वभावाने ती जरा हट्टीच होती. मलाही दोघी मुलीच असल्याने या तिघींचा मात्र खूप मैत्री झाली होती. शनाया दिसायला अत्यंत देखणी अन बोलक्या डोळ्यांची होती. स्वतःच्या रुपाचा सार्थ अभिमान तिच्या वागण्या बोलण्यात सतत दिसायच. माझ्या दोघी मुली अभ्यासात खूप हूषार होत्या, त्याचं शरयूला खूप कौतुक वाटायचं पण शनाया मात्र त्यांना बुक वर्म म्हणत सतत त्यांची चेष्टा करायची. आपल्या आवडीनेच शनायाने शिक्षणासाठी फॅशन डिझायनींगचा कोर्स निवडला होता. त्या कोर्सचे शिक्षण चालू असताना कोर्सच्या दुसऱ्या वर्षी अवध्या अठराव्या वर्षी ती अमितच्या म्हणजे एका आर्मी ऑफीसरच्या प्रेमात पडली, त्याच्या देखण्या अनू रुबाबदार व्यक्तिमत्वाची भुरळ पडली असावी तिला ! मित्र-मैत्रिणींबरोबर एका डिनर पार्टीत शनायाची अमितशी ओळख झाली, अमित शानयाच्या एका मैत्रिणीचा भाऊच होता - त्यामुळे त्या दोघांच्या वरचे वर भेटी होत राहिल्या अन् मग तिने त्याच्याशी लग्न करायचाच निश्चय केला .

अमित जातीने मराठा आणि शनायापेक्षा दहा वर्षांनी मोठा असल्याने शरयु अन् तिच्या पतीचा शशांकचा तिच्या लग्नाला कडाडून विरोध होता , शशांक तर अमितशी बोलायलाही तयार नव्हता, पण मग घरातल्या कुणाचीही पर्वा न करता अचानक एक दिवस शानयानी अमितशी पळून जाऊन लग्न केले आणि मग कुणीच काही बोलू शकले नाही . अमित तसा स्वभावाने सालस अन् मनमिळाऊही होता आणि म्हणूनच पहिली 10-12 वर्ष शनायाचा संसार अगदी सुखासमाधानात चालला होता. शनायाला एक मुलगा अन एक मुलगी अशी दोन गोंडस मुले ही होती, आर्मीमध्ये वीस वर्षे पूर्ण केल्यावर अमित ने आर्मीतुन रिटायरमेंट घेतली होती अन् मग तो पुण्यातल्याच एका मोठ्या खाजगी कंपनीत नोकरीही करायला लागला होता. शनायाने घरच्या घरीच एक छोटे बुटीक काढले होते, त्यामुळे ती मुलं आणि बुटिकमध्ये बिझी असायची..! दोन वर्षांपूर्वी शरयूच्या पतीने शशांकने पुण्यातच एक छान बंगला खरेदी केला होता पण तिथे राहण्या आधीच अचानक हार्ट अटॅकने त्याचे निधन झाले आणि मग मात्र शरयू अगदी एकटी पडली होतो.

# शब्दांच्या पलीकडले

तिचे ते एकटेपण घालवण्यासाठी म्हणून शनाया अन् अमित आता बऱ्याच वेळा शरयूकडे येऊन राहू लागले होते. शरयूला खरे तर कधी कधी शनायाचे तिच्याकडे येऊन रहाणे आवडायचे नाही कारण वयोमानाने तिला कधी कधी आता सतत घरातल्या वाढत्या कामाचा त्रास व्हायचा !! शनाया मूळची हट्टी अन् आळशी असल्याने तिचीही तिला काहीच मदत नसायची..! शिवाय अलीकडे शनाया काहीतरी खुसपट काढून कधी मुलांवर तर कधी नवऱ्यावर चिडचिड करत असायची,अमितशी तर सततच ती काहीतरी वादावादी करत बसायची! अमित हल्ली बराच देवभोळा झाला होता. त्याचा एक कुणीतरी 'दादामहाराज' म्हणून गुरु झाला होता. दर रविवारी तो 3-4 तास त्यांच्या कडे जायचा आणि घरी आल्यावरही बराच वेळ पूजा-अर्चा करण्यात घालवायचा! शरयूला खर तर त्यात काही वावगं वाटायच नाही .

माझी आणि शरयूचीही आता पन्नाशी उलटून तीन चार वर्ष झाली होती त्यामुळे आम्ही दोघीही आता रोज मंदिरात वेगैरे जायला लागलो होतो . डाएटिंगच्या नावाखाली दोघी उपास तापासही बरेच करायला लागलो होतो. या सगळ्यांमुळे अमितचे आणि आम्हा दोघींचे छान जमायचे. शनायाला मात्र ह्या सगळ्या गोष्टी थोतांडच वाटायच्या. ती मात्र दिवसेंदिवस नास्तिक होत चालली होती आणि ह्यातूनच अमित आणि शनायाची भांडणे वाढत चालली होती अमित देवधर्म करता करता ऑर्थोडॉक्स होत चाललाय असं शनायाला वाटत होत - त्यामुळे ती त्याचा सतत राग-राग करायला लागली होती. एक दिवस शनायाने रागारागाने अमितचे त्याच्या गुरुने दिलेले एक धार्मिक पुस्तक फेकूनच दिले. त्या दिवशी त्या दोघांचे खूप जोरदार भांडण झाले. अमित त्या दिवशी इतका रागावला होता की शनायाशीच नाही तर शरयूशीही एकही शब्द न बोलता स्वतःच्या घरी निघून गेला होता. शनायाही दोन-तीन दिवस अमितच्या नावाने चरफडत घरात बसून होती, अन एक दिवस अचानक काहीतरी ठरवूनच अमितकडे गेली होती अन् त्याला डिव्होर्सची नोटीस देऊनच घरी परत आली. आल्या आल्या तिने घरी शरयूला आपण कसे एका वकीलाला गाठुन आमितला डिव्होर्सची नोटीस देऊन आलो हे अगदी रसभरीत वर्णन करुन सांगितले. तिचे बोलण ऐकताना शरयूला भयानक मनस्ताप झाला होता अन म्हणून काही सुचेनासे झाल्यानेच ती माझ्याकडे आली अन तेव्हाच तिन सारी हकीगत सांगितली -

माझ्या शेजारी बसूने बराच वेळ अगदी ती निशब्द झाल्यागत वाटली म्हणून जरा वेळाने मीच तिला बोलती करण्यासाठी म्हणाले "तिन तर सगळं ठरवूनच टाकलय- पण मग तुझ काय म्हणण आहे?"

"मला काही सुचेनासच झालय गं ... म्हणूनच तर तुझ्याकडे आले आहे,आता हिचे हे घटस्फोट प्रकरण संपेपर्यंत ही पोरगी आणी तिची मुले सांभाळायची म्हणजे..... ! माझ्याच्याने होईल का हे सगळं ...? तू शाळेत कॉउंसेलिंग करतेस - माझ्या ह्या अफलातून पोरीला समजावशील ,जर घटस्फोट टळला तर बरं.

अग मी ढीग समजावीन पण ती माझ ऐकायला तरी तयार होईल का?

" तुझ्यावर विश्वास आहे अन् प्रेमही आहे तिचा तुझ्यावर "

हे बघ शरु आता मी जे सांगते ते तू ऐक जरा .. शनायाला काय समजवायचं .... अन समजवायचे का नाही हे आपण नंतर बघु . प्रथम तू एक गोष्ट आता मनाशी पक्की ठरव म्हणजे पक्का निर्धारच कर कि तू आता तिची “ ही जबाबदारी” अजिबात घेणार नाहीस. ती डिव्होर्सची नोटीस नवऱ्याला देऊन तुझ्याकडेच आलीय म्हणजे तिचा तुझ्याकडेच हक्काने रहाण्याचा विचार असणार, तर हे तू अजिबात मान्य करू नकोस कारण - तिची ही असली जबाबदारी आता तू का आणि कशी आणि किती दिवस घेणार ?"

"त्यातून शशांक असता तर गोष्ट वेगळी असती .आणखीन एक गोष्ट आता लक्षात घेकी आपण आता हळू हळू साठी कडे वाटचाल करत आहोत.

आजकालची ही मुल आपल्यालाच सतत ऐकवत असतात ना की प्रत्येकाला ज्याची त्याची स्पेस असायला हवी अन् मिळायलाही हवी. आता आपल्याला ही आपआपली 'स्पेस' मिळायला हवी. तुझी ही लेकही आता पस्तीशीला आली आहे , संसार कसा टिकवायचा हेच जर तिला उपलबध्द आहेत - पाहिजे तर मीच तिला अशी 2-4 पुस्तके वाचायला देऊ शकते.

# शब्दांच्या पलीकडले

शरीराचे सौंदर्य अन सुधृढता टिकवण्यासाठी  आजकालच्या ह्या  मुली ब्यूटी पार्लरमध्ये सतत जात असतात तसच मनाचे सौंदर्य आणि सुधृढता  वाढवायची असेल तर ही  पुस्तकेच खर तर वाचली पाहिजेत अर्थात  हे सगळ तत्वज्ञान शनायाला सद्य परिस्थितीत कितपत समजेल अन् पटेल मला माहीत नाही, पण तुला मात्र हे पटलच पाहिजे.

तू आज तिला एवढेच  पटवून द्यायला पाहिजे कि तिला जर डिव्होर्स घ्यायचा  असेल तर तिची आणि तिच्या मुलांची  राहण्या -खाण्याची सोय तिची तिलाच करावी लागेल.. ! जोपर्यंत ही जबाबदारी  ती स्वतः घेत नाही तोपर्यंत तू"

तिला तुझ्याकडे ठेऊन घेऊ नकोस.  जबाबदारी अंगावर पडल्याशिवाय व्यक्ती जबाबदार होतच नाही.

आणि आता हे सगळ शनायाला तू समजवणार आहेस ,मी  नाही . तू हे नक्की करु शकशील,माझी पूर्ण खात्री आहे. शनायाला हे समजण्यासाठी कुणा काउन्सेलरची  गरज नाही तिच्या आईचीच आहे.

बी ब्रेव ॲन्ड प्रॅक्टिकल शरु !

तुझी हिंमत वाढवायला मी तुझ्या पाठीशी आहे - पण शनायाला शहाणपण आणि समज तूच द्यायची आहेस. चल तू निघ  आता, माझे मिस्टर आज जेवायला घरी येतोयत त्यांना हे सगळे रामायण एवढ्यात नको सांगायला .....  नकोच सांगूयात...., बरोब्बर आहे न ..... ?

माझी सगळी बडबड ऐकता  ऐकता शरयूचे डोळे परत एकदा भरुन आले होते - पण त्या भरल्या डोळ्यातही मला अक वेगळीच चमक दिसायला लागली होती - आणि मग परत एकदा मला घट्ट मिठी

मारता मारता भरल्या गळ्याने अन भरल्या डोळ्यांनी शरयूने माझा निरोप घेतला ..!

**लेखिका - श्रीमती अनुराधा चितळे**

**PRAMOD HOLE,** Broker, Realtor

VASTU REALTY



Buyer Rebate Up to 2% | Licensed in NC and SC
realtorpramod@gmail.com | 980-272-7283

**Deepali Holé** Broker, Realtor
980-500-9392

VASTU REALTY



REALTOR®

Buyer rebate up to 2%
Email: realtordeepali@gmail.com

# “सुखी वार्धक्य” - एक शब्दचित्र

हल्ली खूप सारे आंतरराष्ट्रीय 'डे' साजरे करण्याची आपल्याला सवयच लागली आहे. कधी मदर्स डे, कधी फादर्स डे, कधी टिचर्स डे, कधी चॉकलेट डे, कधी व्हॅलेंटाईन डे, कधी फ्रेन्डशिप डे तर कधी वुमन्स डे. वर्षभरातील या 'डें' चा लेखाजोखा बघितल्यास जवळपास प्रत्येक दिवस कुठल्यातरी 'डे'साठी बुकिंग करण्यात आला आहे.

आपल्या संस्कृतीत देखील काय हो...आपण मंडळी कळत नकळत एकादशी डे, संकष्टी डे, शनी मारुती डे, सोमवार ते रविवार कोणत्या ना कोणत्या देवी देवतांचे सर्वच डे, वटसावित्री डे, चातुर्मास डे, काकड आरती डे, सोळा सोमवार डे, 21 निर्जळी संकष्टया डे, गोविंदा दहीकाला डे, शिमगा डे, धुळवड डे हे काही भक्तिमय आणि काही धांगड धिंगा उत्सवी "डे" वर्षभर साजरे करीत असतो. फक्त याला "डे" संबोधित नाही. खरे तर तेही "डे" च असतात असं माझं प्रांजळ मत आहे.

ही यादी न संपणारी आहे. पण विचार करा एवढे उपास तापासाचे व्रतवैकल्यांचे "डे" साजरे करून आपल्या आचार विचारात खरंच काही फरक पडतो कां. तर याचं उत्तर "नरो वा कुंजरो वा" असं अर्धसत्य आहे. धड हो नाही नि धड नाहीही नाही. मी तर म्हणतो माणसाच्या मूळ स्वभावात काहीSSSही फरक पडत नाही.

अहो "स्वभावाला औषध नाही" हे स्वीकारावेच लागते. ही म्हण उगाच नाही तयार झाली. तरी पण पथ्यपाणी सांभाळले तर औषध लागू पडते तसं स्वभावावर पथ्यपाणी असलंच पाहिजे की... कां असू नये?

परमेश्वराने माणसाच्या मेंदूत स्वभावाचं रसायन ओतताना परीक्षा नळीत रागीट, चिडचिडा, भावनाशील, संवेदनशील, संशयी, सावध, हट्टी, जिद्दी, आनंदी, हसतमुख, मिश्किल, विनोदी, शांत, समाधानी, चपळ, मौनी, स्वार्थी, उदार असे डीएनए चे लिक्वीड ड्रॉप्स टाकले असणार. त्यातूनच स्वभावांची भट्टी लागली असली पाहिजे.

मला वाटते आपल्याकडे अशा स्वभावांवर औषध म्हणून नो चिडचिड डे, नो भांडण डे, नो टोकाटोकी डे, नो हट्ट डे, नो टेन्शन डे, नो कम्प्लेंट डे, नो तुलना डे, मिश्किल गप्पा डे, स्माईल शेअरिंग डे, कौतुक डे, कृतज्ञता डे, औदार्य डे, खळखळून हास्य डे, कीप सायलेन्स डे...हे आणि अशा सारखे 'डे' साजरे करण्याची खरी गरज आहे.

घरोघरी कुटुंबामध्ये सर्रास म्हणजे 24x7 चिडचिड चालू असते याबाबत तुम्हाला काय वाटते.

आमच्याच घरात बघा ना! आज सकाळी सकाळीच सौ.स्मिताची चिडचिड चालू होती. माझ्याकडून बेडटी चक्क बेडवर सांडला. तो माझी शिंक न आवरता आल्यामुळे. नंतर नाश्त्याची तयारी चालू असताना गॅस सिलेंडर संपला. तिच्या चिडाचिडीत भर पडली. कुमार शिरीष आणि कन्या सोनाली आपापल्या मोबाईलमध्ये इतके गढले होते की ऑनलाईन गणिताचे क्लास अटेंड करण्याचे साफ विसरुन गेले. "माझे घरात अजिबात लक्ष नाही" असे म्हणून चिडचिड करीत मुलांचा राग तिने माझ्यावरच काढला. भरीत भर नेमकी मोलकरणीने दांडी मारली. भांडी स्वच्छ करताना आदळ आपट करीत चिडून तिने माझ्याकडे मोठ्ठे डोळे करून पाहिले.

आपली चाळीशी हरवली असे म्हणून वार्धक्यातला चष्मा नेहेमीच कपाळावर घेऊन हिंडणारे आजोबा (आमचे पिताश्री) आजींकडे जाताच (आमच्या मातोश्री) आजींनी चिड चिड करीत "जरा डोक्याचा वापर करा. पण ह्यांचे ना...पालथ्या घड्यावर पाणी." असा कालवा केला.

घराबाहेर देखील चिडण्याला अनेक कारणे असतात. शेजारच्या रमा काकूंचं सकाळी सकाळी तोंड पाहिलं की दिवस खराब जातो असं स्मिताचं मत आहे. आज नेमके तसंच घडलं. त्या मुरवण लावण्यासाठी सकाळी सकाळीच चमचाभर विरजण (दही) मागायला आल्या. आणि स्मिताने चिडचिड करीत चेहरा विरजणापेक्षाही आंबट केला. खरं तर ही किती शुल्लक वस्तू. पण "करांगुले वसते लक्ष्मी....प्रभाते करदर्शनम" ऐवजी प्रभाते काकू दर्शनम झाले.

आजोबा पेपर वाचण्यात गढले असतानाच शेजारचे पेंडसे आजोबा घरात घुसले. "फक्कड पैकी चहा पाहिजे. सौभाग्यवती स्मिताच्या हातचा चहा... म्हणजे अमृत." आधीच चिडलेल्या स्मिताची तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था झाली. दुसरीकडे पेंडसे आजोबांनी आमच्या पिताश्रींच्या हातातील पेपर जवळ जवळ ओढूनच घेतला आणि "काय म्हणते महायुती आणि

महाआघाडी?" असे म्हणत पेपर वरुन आपल्या जाड भिंगाच्या चष्म्यातून नजर फिरवायला सुरुवात केली. आमचे पिताश्री आतल्या आत चिडले पण काय करणार. आलिया भोगासी असावे सादर.

बरं...स्मिताने नाईलाजाने केलेला फक्कड चहा पेंडसे आजोबांसहीत सर्वांनी ढोसला. जाताना पेंडसे आजोबा कोडी सोडवण्याचे पान काढून स्वतः बरोबर घेऊन गेले. याला काय म्हणावे. आमच्या आईसाहेबांची चिडचिड सुरु झाली. दुपारी पिताश्री झोपतात तेंव्हा आमच्या आईसाहेब कोडी सोडवण्यात दंग असतात. संध्याकाळी शिरीष आणि सोनाली यांच्यात टी. व्ही. लावण्यावरुन चिडाचिड झाली. शिरीषला टी 20 वर्ल्ड कप लावायचा होता तर सोनालीला महाराष्ट्राची हास्यजत्रा लावायचे होतं.

# नो चिडचिड डे

एक दिवस महिला मंडळाच्या भिशीहून परत आल्यावर स्मिता हसून म्हणाली,"अहो sss आज आमच्या मंडळात भिशीची सोडत काढताना खूप टोकाटोकी झाली. इव्हीएम मशिनवर जसा संशय घेतला जातो तसा चिठ्या तयार करणाऱ्यावर देखील संशय घेतला गेला."

"अरेच्च्या...मग काय झालं. काही मार्ग निघाला कां?" मी विचारले.

"अहो...टोकाटोकीवरुन टीका टिप्पणी...त्यातून चिडाचिडी...

कुरघोडी... मग वाद वाढला. काहीजणी वसकन एकमेकांच्या अंगावर धावल्या. यातून काड्या लावणे... काड्या घालणे...आगीत तेल ओतणे...आगीतून फुफाट्यात...अखेर झिंज्या ओढण्याचेच बाकी राहिले."

"अरेरे...तुमचे भिशी मंडळ आहे की ढिश्यांव ढिश्यांव मंडळ आहे. भिशी मंडळात नेहेमी असेच होत असतं कां?. आता...रोज मरणार त्याला कोण रडणार."मी म्हणालो.

"आणखी ऐका काय झालं ते. भिशी फोडल्यानंतर मंडळात

पाठोपाठ गप्पाष्टककार सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ.संजय उपाध्ये यांची मनःशांती आणि अध्यात्म यावर दोन तासाची कार्यशाळा आयोजित केली होती."स्मिता म्हणाली,"त्यामुळे महिलांचे हेवी वेट बॉक्सिंग थांबले. सारे कसे शांत शांत झाले. जोरदार वाऱ्याबरोबर उडालेली धूळ नंतर खाली बसावी तशा साऱ्याजणी चडीचूप झाल्या."

"अरेच्च्या sss चमत्कारच झाला म्हणायचा. बाकी पुढे काय झालं. डॉक्टरांचे मनःशांती व अध्यात्म थोडे थोडे तरी डोक्यात शिरलं कां या महामायांच्या?" मी पटकन जीभ चावून बोललो.

महामाया म्हणताच स्मिताने डोळे वटारले कारण ती पण त्यात आलीच ना. मात्र नंतर खळखळून हसत ती म्हणाली, "अहो sss ही डॉक्टरांची माया...त्यांनी जे प्रवचन दिलं त्याने सारा महिलावृंद मंत्रमुग्ध झाला. ब्रम्हानंदीच लागली साऱ्यांची."

"वाव... खरंच जादूची कांडी फिरली की काय?"मी म्हणालो.

"अहो sss मनःशांती वर त्यांनी महत्त्वाचं मार्गदर्शन केलं. आठवड्यातून एक दिवस शक्यतो सुटीच्या दिवशी सारे घरी असतात. त्यामुळे प्रत्येकजण सांगितलेला उपाय करताना पथ्यपाणी सांभाळू शकतो."

"हो कां...काय काय उपाय सुचविला त्यांनी?" मी

"त्यांनी वेळापत्रकच आखून दिलंय. या रविवारी "नो चिडचिड डे...पुढल्या रविवारी "नो टोकाटोकी डे" ...त्यानंतर "नो कंप्लेंट डे " अशी भली मोठी यादीच दिलीय त्यांनी."

"अच्छा तर आपल्या घरी या रविवारी "नो चिडचिड डे" सेलिब्रेट करायचा तर?... म्हणजे नक्की काय करायचं?" मी म्हटले.

"अहो sss सात्विक बोलायचं, सात्विक वागायचं, सात्विक खायचं, सर्व काही सात्विक गुण अंगिकारायचे." स्मिता.

"सात्विक बोलायचं म्हणजे काय करायचं. "मी.

"म्हणजे खरे बोलणे...प्रामाणिकपणे बोलणे. दुसऱ्याला त्रास होईल असे बोलणे टाळणे. शब्दांची निवड गोड, आदरार्थी असावी. शांत चित्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जीभ आणि मन यांच्यावर नियंत्रण ठेवणे."

"बाप रे... असं वागायचं तर बैलासारखी वेसणच घालायला हवी मनाला आणि चित्ताला." मी.

"अहो sss मन करारे प्रसन्न हा उपाध्ये सरांच्या चिंतन विषयाचा गाभाच आहे तो." स्मिता म्हणाली.

"काय गं ...आणि सात्विक वागायचं म्हणजे काय करायचं."माझा नवा प्रश्न.

"सात्विक वागायचं म्हणजे कोणत्याही फलाची अपेक्षा न करता निष्काम कर्म करणे, संयम राखणे, विनम्र रहाणे, विवेकी वागणे, परोपकार करणे. सात्विक वागण्याने मनाची शुद्धता आणि सकारात्मकता वाढते."स्मिताने कार्यशाळेतून बरेच ज्ञान उचललेले होते त्याची चुणूक तिच्या बोलण्यातून दिसत होती.

"आणि सात्विक आहाराबद्दल काय काय म्हणाले ते?" मी पुन्हा विचारले," म्हणजे कच्च्या पालेभाज्या, गाजर, काकड्या, खजूर, गुडदाणी असं काही खायला सांगितले कां त्यांनी?"

# नो चिडचिड डे

"तेही ऐका...ताजे नैसर्गिक अन्न...म्हणजे ताजी फळे, ताज्या भाज्या, संपूर्ण धान्य, डाळी, कडधान्ये, शुद्ध तूप, दूध, दही, मध आणि सुकामेवा खाणे. सात्विक आहारामध्ये राजसिक आणि तामसिक पदार्थ खाणे वर्ज्य." स्मिता.

"आता हा पदार्थ राजसिक आणि तामसिक आहे हे कसं ओळखणार?" माझ्या मेंदूत रजोगुण आणि तपोगुण हे दोनच शब्द कसेबसे लोड केलेले आहेत. अर्थ समजण्या पल्याड गेलेले.

"राजसिक म्हणजे मनाची अस्वस्थता वाढवणारे आणि तामसिक म्हणजे आळशीपणा, सुस्तपणा वाढवणारे. तिखट, तेलकट, मसालेदार, जास्त तळलेले, शिळे झालेले आणि मांसाहारी पदार्थ, तसेच कांदा, लसूण आणि मशरुम हे पदार्थ वर्ज्य." स्मिताचा खुलासा.

"अगं मग खाण्याचे शिल्लक तरी राहिले काय. हे वर्ज्य...ते वर्ज्य... म्हणजे काळया पाण्याची शिक्षा आहे की काय?...तिखट मीठ न टाकलेली भाजी, कांजी, निकृष्ट पोळी, कडबा, गवत असले काही खायचं कां?."मी म्हणालो.

"काय तरीच काय...तुम्हाला सेल्युलर जेलमध्ये बंद करून टाकल्यासारखे बोलताय. अहो...प्रयोग केल्याशिवाय त्याची सिद्धता कशी कळणार. या रविवारी आमच्या भिशी मंडळाने  प्रत्येकाच्या घरी "नो चिडचिड डे"सेलिब्रेट करायचा असे जाहीर केले आहे. तर व्हा तयार..." स्मिताने घरात जाहीर घोषणा केली.

"स्मिता...घरात सगळ्यात जास्त चिडचिड कोण करीत असेल तर ती तू sss बघू या. घोडामैदान जवळ आहे." मी हसून म्हणालो.

माझ्या या कमेंटवर स्मिता चिडलीच...चिडणार नाहीतर काय करणार. पण आज चिडण्याचा तिला हक्क आहे. रविवारचे रविवारी बघू.

रविवार उजाडला. सकाळी सकाळीच स्मिता उठली. माझा बेड टी आनंदात घेऊन आली. "गुड मॉर्निंग डिअर" मोठ्या गोड आवाजात तिने मला "डिअर" म्हटले. माझ्याबरोबर तिने चहा देखील शेयर केला.

हळू हळू सारे जण अंथरुणातून सावधपणे उठले. हो कारण "नो चिडचिड डे" साजरा करायचा होता ना. आजोबांनी मिचमिचे डोळे करीत आजींना "गुड मॉर्निंग" केले. त्यांनी आजीला फ्लाइंग किसही दिला. लाजून चूर झालेल्या आजीने कसेबसे गुड मॉर्निंग म्हटले.

आजोबा देवपूजा केल्याशिवाय चहा घेत नाहीत. आजीही षोडशोपचार पूजेची तयारी करण्यात व्यग्र असते. ते सोवळ्यात येण्यापूर्वीच आजीने ताम्हण, पळी पंचपात्र न आपटता दिले, बैठकीचा पाट आवाज न करता मांडला. वस्त्र, कलश, गंध, अक्षता, तुळशीची पाने, फुले चांदीच्या ताटात सावकाश ठेवली.  दूध..दही.. तूप..मध.. साखर यांचे पंचामृत तयार करताना रोजच्या सारखी अजिबात चिडचिड आणि खळखळ

केली नाही.

शिरीषने तोंडांत टूथब्रश कोंबुनच गुड मॉर्निंग केले. स्मिताने न चिडता त्याचा दोष टिपून त्याला मऊ आवाजात समजून सांगितले. सोनालीने तिच्या बेडरूम मधून बेडटी ची ऑर्डर दिली. पप्पा रोज बेडटी आधी घेतात आणि दात नंतर घासतात. मीही रोज बेडटी घेणार. स्मिताने तिला प्रेमानं बेड टी नेऊन दिला. आणि न चिडता माझ्याकडे पाहून म्हणाली,"उद्यापासून तुझ्या पप्पांच्या हातात आधी कोलगेट टूथब्रश आणि नंतर "टेबल टॉप टी" देईन बरं. बेड टी बंद. "

अंघोळीला नेहेमीप्रमाणे मी टॉवेल न्यायचे मुद्दाम विसरलो. पण स्मिताने चिडचिड न करता माझा टॉवेल बाथरुममधून बाहेर काढलेल्या माझ्या हातावर अलगद ठेवला. एरवी हात पिरळल्याशिवाय टॉवेल मिळत नाही.

एकूणच दिवसाची सुरवात चिडचिड न करता झाली. कुणीही रजोगुण, तपोगुण उधळले नाहीत.

नाश्त्याला रविवारी इडलीडोसा असतो पण स्मिता रात्री पीठ भिजवायचं विसरली. तिनं चक्क शॉर्ट कट मारुन दही,पोहे,गूळ यांची स्मूदी सगळ्यांना वाढली. हा प्रकार एकतर गिळगिळीत होता त्यात भर म्हणून सोबतीला वाटीभर पाण्यात भिजवलेले मधमिश्रित ओट्स प्रत्येकाला दिले. चटक मटक खाणाऱ्या प्रत्येकाने तोंड वेडेवाकडे केले. एरवी शिरीष आणि सोनाली यांनी आंबुस कमेंट केली असती आणि स्मितानं "मुकाट्याने गिळा" म्हणून दम भरला असता.

आजी आजोबा मात्र "पचायला हलकं आहे बरं कां हे." असं म्हणून एक नंबरची पसंती दिली. स्मिता मला उद्देशून म्हणाली,"काय हो sss आवडला कां नाश्ता!" मला अर्थात ती टोचून बोलत होती हे न समजण्याइतका मी दूधखुळा नव्हतो. पण चेहऱ्यावर सात्त्विक भाव दाखवित मी अंगठा आणि तर्जनीचे बोट जुळवीत उरलेल्या तीन बोटांचा मोर पिसारा खुलवून "एकदम फर्स्ट क्लास" असं म्हणून दाद दिली.

# नो चिडचिड डे

स्मिता म्हणाली,"आता रोजच आपण वेगवेगळ्या प्रकारची स्मूदी खाऊ या. एकदम सात्विक फुड" मी त्यावर छान...छान... असा शेरा मारला.

शेजारचे पेंडसे आजोबा अगदी नाश्त्याच्या चहाच्या वेळी उपटले. खरं म्हणजे हा शब्द आज तरी वापरणे प्रसंगोचित नाही. पण माझे "स्वगत" समजा. आमच्या पिताश्रींनी मोठ्या मनाने घडीही न मोडलेला पेपर त्यांच्या हातात आनंदाने दिला.

"काय म्हणते महायुती?" पेंडसे आजोबांचा गुळगुळीत झालेला नेहेमीचा प्रश्न.

"आमच्या घरात आज आमचीच महायुती झाली आहे. नो चिडचिड डे चालू आहे." मी कौतुकाने म्हणालो.

"तरीच आमच्या सुनबाईने देखील आज खास गवती चहा

पाजला. "

"काका ...बरोबर आहे. आज आपण गवत खाऊन राहायचे.

कच्च्या पालेभाज्या, कंदमुळे खाऊन दिवस साजरा करायचा." मी म्हणालो.

एकूण भिशी मंडळाच्या सर्व सदस्य महिलांकडे "नो चिडचिड डे" ने बाळसे धरलेलं दिसत होतं. आमच्या मातोश्रींनी स्वखुशीने पेपरातले कोड्याचे पान काढून पेंडसे आजोबांना दिले. आजींना खुश करण्यासाठी शिरीषने त्या पानाची स्कॅन कॉपी गुपचुप आधीच काढून दिली होती. सोनालीने स्मिताला मदत म्हणून खास मसाला चहा करून सर्वांच्या पुढे मांडला.

पेंडसे आजोबा म्हणाले, "अगं सोनू...तुला बघायला पाहुणे येतील तेंव्हा चहा पोहे करायलाच लागतील. आता तुझे दिवस आईकडून लाड करून घेण्याचे आहेत."

रविवारी लंचला हमखास पापलेट, कोळंबी फ्राय किंवा सुरमई, हलवा यांचा मेनू असतो. सोबतीला खास सोलकढी असते. पण आज स्मिताने नॉनव्हेज वर्ज्य म्हणून जाहीर केले. आता मेनू कोणता हे तिने गुलदस्त्यातच ठेवले.

दुपारी तुळशीची सुगंधी पाने टाकलेले... गूळ-लिंबाची गोडी असलेले आणि बर्फाचं एक क्यूब टाकलेले सरबत तिने टेबलावर मांडले. एरवी ती मंचाओ सूप किंवा हॉट अँड सोअर सूप तयार करते.

नंतर तिने तुपात परतलेले कमी मीठ टाकलेली मूग आणि तांदूळ...अशी सौम्य खिचडी वाढली. हो, बीपी कंट्रोल व्हायला हवा ना. आणि काकडी, गाजर, दही यांची प्रेमळ कोशिंबीर दिली. थोडा स्मोकी फ्लेवर असलेला फुलका दिला. खरं तर तो करपलेला फुलका होता.

सोबतीला स्वीट म्हणून माव्याचा पेढा टाकलेले दूध दिले. कारण श्रीखंडाने आणि बासुंदीने सुस्ती येऊन तामस गुण वाढला असता. कांदा, लसूण विरहित पडवळीची अर्धी कच्ची भाजी तिने ताटात वाढली होती. भाजीचा अवतार ओळखणे बुद्धीचातुर्याच्या पलीकडचे होते.

"अगं sss छान स्वयंपाक केलास पण तो केळीच्या पानावर वाढला असतास तर अधिक सात्विक झाला असता." मी टोमणा मारला असला तरी स्मिताने अजिबात चिडचिड न करता म्हणाली,"अहो...प्लास्टिकची हुबेहूब पाने, फुले, गुच्छ जसे बाजारात मिळतात तशी प्लास्टिकची हिरवीजर्द केळीची पाने बाजारात आली की रोज ताट लावण्याऐवजी पानं लावू आपण." सर्व जण माझ्याकडे पाहून फिदीफिदी हसायला लागले.

रात्रीचे भोजन दिवे लागणीच्या आधी म्हणजे सात वाजता दिले जाईल असी स्मिताने फर्मानच काढले. आजींनी देखील "आमच्या वेळी दिव्यात वात आणि ताटात हात" असंच होतं असं म्हणून अनुमोदन दिलं. "लवकर जेवावे...लवकर झोपावे...लवकर उठावे." असं म्हणून आजोबांनी देखील पाठराखण केली.

"आजोबा कशाला उद्याची बात. निवांत उठावे. उद्या काही कुठला "डे" सेलिब्रेट करायचा नाही." शिरीष म्हणाला.

माझी त्याला मनातून संमती होती. फक्त वाद टाळण्यासाठी तेरी चूप मेरी चूप असा पर्याय निवडला.

आजींनी देवापुढे निरंजनाची वात पेटवली. शिरीष आणि सोनालीने दिव्या दिव्या दीपत्कार म्हणून आजतरी टाळ्या वाजवल्या. उद्याची टाळ्या, घंटी वाजवण्याची नो गॅरंटी.

प्रत्यक्ष डिनरच्या ताटात भाज्यांचे साधे सूप, वरईच्या तांदळाचा भात, तेल, तिखट, कांदा, लसूण न टाकता वाफवलेला दुध्या भोपळा आणि उपवासाला करतात तशी शेंगदाण्याची आंबट गोड आमटी वाढली होती. सर्वकाही गोड मानून आणि आचमन करून "वदनी कमळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे" ही प्रार्थना आजोबांनी म्हटली. अशारितीने मुकाट्याने यथेच्छ भोजनाचा सात्विक लाभ घेतला.

# नो चिडचिड डे

रात्री सर्वजण नो चिडचिड डे च्या रम्य स्मृती अनुभवीत

लवकर झोपी गेले. झोपताना मात्र प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन होता. पण त्याबद्दल कुणीही चिडचिड केली नाही.

दुसऱ्या दिवशी उजाडताच स्मार्टफोनच्या व्हॉट्सअॅप मध्ये आंतरराष्ट्रीय "फास्ट फूड डे" असल्याची घोषणा शिरीषने केली.

ब्रेक फास्ट, लंच, डिनरला कोणाला काय हवंय हे विचारुन घेत स्वीगी आणि झोमॅटोमध्ये मध्ये मी ऑर्डर दिली.

चीझी पिझ्झा, डबल चीझ बर्गर, फ्रेंच फ्राइज, मोमोज, चायनीज मांचुरियन, चिकन विंग्ज, चिकन लॉलीपॉप, चिकन पॉपकॉर्न, कॉम्बो मील्स या साऱ्या पदार्थांनी "फास्ट फूड डे" साजरा करण्यात आला.

विशेष म्हणजे आजही कुणी चिडचिड न करता खाण्याचा आस्वाद घेतला. आजी आजोबा देखील अलीकडे फास्ट फूड खाण्यात पारंगत झाले आहेत.

तिसऱ्या दिवशी मात्र स्मिता बाणेदारपणे हात उंचावून आणि तर्जनीच्या बोटाने निर्देश करीत लोकमान्य टिळकांसारखे म्हणाली," चिडचिड करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी अमलात आणणारच."

आटपाट नगरातली साठा उत्तराची नो चिडचिड डे कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

**लेखक**

**सुरेशचंद्र वाघ**

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

24 May 2025

I Landed 6.30 am at KEF airport.

Mayuresh with families joined around 8.30 am

Keflavík Skaftafell

Day 1. --Blulgoon

आम्ही विमानतळावरून गाडी भाड्याने घेऊन blul lagoon ला गेलो.मुक्ता आमची ड्रायवर. नवीन जागा गाडी पण Land cruiser, रोजच्या सवयीतली नाही तरी गाडी चालवण्यात अगदी सहजता.

Iceland.चा पहिला दिवस.

The Blue Lagoon is a geothermal spa located in the heart of the Reykjavik is UNESCO Global Geopark in Iceland. It's water was honored as one of the 25 wonders of the world by National Geographic in 2012. This stunning lagoon holds six million liters of geothermal seawater, which is naturally renewed every 40 hours. The lagoon is shallow, with an average depth of 1.2 meters (about 4 feet) and a maximum depth of just over 1.5 meters (about 5 feet). The average temperature of the water is a warm and inviting 37-39°C (98-102°F), perfect for bathing in Iceland's cool climate.

The water in the Blue Lagoon is unique due to its rich content of silica, algae, and minerals, giving the lagoon its famous milky blue appearance. These components have skin-healing and rejuvenating properties, distinguishing the Blue Lagoon from any other spa in the world.

तेथे जाताना रस्त्याच्या बाजूंना नांगरल्या सारखे lava rocks क्षितिजा पर्यंत दिसतात.

Blue Lagoon ला पोहचतो तेंव्हा बाजूनी दुधाची नदी वहातेय असे निळसर पाणी दिसते thermal water यातली silica clay gives the water milky texture and sunlight gives blue shade to it. पाणि नैसर्गिक गरम असते वाफाळत्या चहा सारख्या वाफा बाहेर पडत असतात.

या निसर्गाला Comercial touch देऊन सुंदर जागा निर्माण केली आहे.रोज हजारो लोक याचा आनंद लुटतात.

एकदा आत जाताना मनगटावर टॅग (कडे) घातले की सगळ्या सोयी टॅग scan केला की मिळतात ठिक ठीकाणी मदतनीस तत्पर असतातच.स्वच्छ मोठे टॉवेल,रोब, सामान ठेवायला मोठे लॉकर असतात.आम्ही रिसॉर्टच्या आत जाईपर्यंत प्रचंड वारा,थंडी, मधूनच पडणारा पाऊस होता.

पुढे दिसणाऱ्या पाण्यात जायला जरा धाडस गोळा करावे लागते.

गळ्यातले,कानातले (पाण्यातल्या मिनरल्स मुळे खराब होऊ नये म्हणून) काढायला सांगतात

Swimming suite घालून शॉवर घ्याययचा.शाम्पू,कंडिशनर, गरम पाणी सगळे असते.मग दारातून बाहेर पडून पुढच्या पांढर्या -निळ्या वाफळणार्या पाण्यात जायचे.

जायच्या आधी 10/15 पावले चालून अती गारठ्यातून गरम पाण्यात शिरायणे जरा बिचकायलाच होते. त्या ऊबदार पाण्यात गेल्यावर काय वाटते ते अनुभवायलाच हवे.

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

गरम पाण्यात बागडताना एका बाजूला ड्रिंकचा बूथ, एका बाजूला सोना बाथ,एका

बाजूला चेहऱ्यावर mask लावण्याची सोय अशी मजा करत blue lagoon चा संस्मरणीय आनंद दोन अडिच  तास लुटला.

पाण्यातून बाहेर आल्यावर पुन्हा शॉवर घेऊन  तीन /चार कपडे एकावर एक घालून,जॅकेट चढवायचे. ओले कपडे छोट्या Drier मधे एका मीनीटात पिळून काढता येण्याची सोय आहे. सगळे व्यवस्थापन अतीशय शिस्तबद्ध आणि मदतीला हसतमुखाने तयार असणारे मदतनीस अजून काय हवे.

तेथे जेवून ताजे तवाने होऊन पुढे

जवळच्या Reyjavik या राजधानीच्या गावात B & B मधे मुक्कामाला निघालो.

आत्ता पर्यंत 6° तपमान आणि भरपूर वारे होते पाऊस नव्हता.

आम्ही नऊ जण राहू शकू असा मोठ्ठा apartment होता.  तेथे जायच्य आधी बाहेर जेवण करुन दुसऱ्या दिवशीच्या breakfast करता दूध,ब्रेड,अंडी,फळे,cold meat इत्यादी खरेदी केली.

हे सगळे करे पर्यंत रात्रीचे दहा वाजून गेले होते. इथे गावात शिरताना पाऊस लागला.

सगळेच आदल्या रात्रीचा प्रवास करुन पहाटे तेथे पोहचलो होतो. It was  long day for all of us.

तरीही मस्त तरतरीत होतो.

रहायची जागा व उबदार बेडस्

बघून तर एकदम खूष झालो. रात्रीच्या लख्ख ऊजेडात गप गुमान झोपलो. 22/23 तासांचा दिवस.









# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

**Tectonic plates**

Day 2: Golden Circle704 634 3021 uWonders (May 26th)

दुसऱ्या दिवशी आम्ही Reykjavik हून  east to west असे  golden circle loop केले. Þingvellir National Park: Witness the continental drift between the North American and Eurasian tectonic plates.

Þingvellir is a remarkable geological site where you can see the separation of the tectonic plates: Eurasian and North American. It is one of the few places on Earth where this movement can be seen on land. The Mid-Atlantic Rift or Ridge, which runs through Iceland, marks the boundary between the two plates

फोटोत geological separation स्वच्छ दिसतय . दोन्ही बाजूला असे एवढे अजस्त्र दगड एकावर एक ठेवल्या सारखे  दिसत आहेत. याची रुंदी हळू हहळू विस्तारत आहे. भूकंपाने जमीनीवर मोठाल्या भेगा पडलेल्या दिसतात तसेच काहिसे volcano मुळे जमीनीच्या वर झाले आहे.कित्तेक शतकापूर्वी भारताचे दक्षिण टोक व दक्षिण अफ्रीको असे एकमेकाला जोडलेले होते. Tectonic plates मुळे ते विभागले गेले. पृथ्वीवर अशा मेजर नऊ tectonic plates आहेत.





# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

Geyser

- Geysir Geothermal Area: Marvel at Strokkur geyser erupting every few minutes.



जमिनीतून दर 4/5 मीनीटाने गरम पाण्याचे उंचफवारे / कारंजे जमिनीतून येते.हे सगळे Geothermal चे प्रताप

ठिक ठिकाणी लहान मोठी  Geyser लांबवर दिसत असतात. छोटे खड्डे दिसले तर त्यात पण पाणि उकळताना दिसते.

इथून पुढे आम्ही गेलो मोठा धबधबा पहायला. मधल्या गाडीच्या प्रवासात बरेच वेळा पाऊस होता. इतका

शहाणा पाऊस म्हणजे देवाचीच  कृपाच होती. नाहीतर मग आमचे अवघड होते. रस्त्यात ठिक ठिकाणी निसर्ग पहाण्याकरता view points आहेत. इथे दूर पर्यंत सगळीकडे खडकाळ जमीन आणि डोंगर रांगा. मधेच लांबवर एखादे छोटे गाव दिसते रंगी बेरंगी घरे लक्ष वेधून घेतात. क्वचित ठिकाणी हिरवी कुरणे झाडे दिसायची तिथे मेंढ्या त्यांची गोड पिल्ले, घोडे पण बरेच दिसले. ग्लेशीयरस् मधे एक पांढरा कोल्हा दिसला. तिथल्या  लोकरीची खासियत अशी की पावसात त्याचे कपडे ,स्वेटर  बाहेरुन ओले  झाले तरी आतून कोरडे रहातात.. त्यामुळे  महाग असतात असे कळले.

घोडा कामाचा राहिला नाडी की त्याचे मांउस स्थानिक लोक खातात.

**Gullfoss waterfall -Cascading over 98 tires**

It is located in the canyon of the Hvita river in southwest Iceland

105 फूट उंचीचा धबधबा मधे काही अंशात दिशा बदलतो. ऊन असेल तर या दुसऱ्या भागात मोठ्ठे अर्ध गोलाकार इंद्रधनुष्य दिसते. आम्हला अगदि परतीच्या वाटेवर छान दिसले. बरेच वर चढून जावे लागते. पाया खाली सगळा दगड ,पाण्याचे तुषार जे वरती येतात त्यामुळे ओले असल्याने घसरुन पडायची भिती असते. water-proof -shoose, jacket,pant, gloves घालून सजले होतो म्हणूनच निभाव लागला नाहितर एवढ्या थंडित काकडलोच असतो. मुक्ता/ मयुरेश कायम आजूबाजूला होते, सावनी सुधा खूप काळजी घेत होती. माझ्या हातात पाण्याची बाटली, बॅग असेल तर कुठे वर खाली अवघड वाट असेल तर लगेच ते मागून स्वत:कडे घ्यायची.

धबधब्यावरुन नजर हटत नव्हती. सगळे मोहक दृष्य नजरेत मावत नव्हते.

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.







# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

आज मी 19000 पावले चालले. पण हवेत नक्कीच जादू असावी. अजिबात थकवा जाणवत नव्हता. नवीन दिवसा करता उद्या तयार.




Day 3: South Coast Adventure (May 27 th )

.Kerio crater —is a volcanic cone that collapsed and filled with water after an eruption about 6500 years ago. You can walk down up to the water,

1-photo —-At the top of the crater

2 photo—at the bottom





# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.



Getting down near the water ,a beautiful reflection of the sky in the water.

आज आम्ही आमचा दोन दिवसाचा Reykjavik चा मुक्काम संपवून golden circle west side असलेल्या Keri's crater बघायला आलो. नंतर आणिक एक धबधबा पाहून रात्री 8/9 पर्यंत Vick या गावातल्या आमच्या दोन दिवसाच्या घरी रहायला जाऊ. ही घरे फार सुरेख होती. मोठी, सर्व सोयी असलेली सुबक सुंदर,

बाजूला प्रसन्न निसर्ग. दिवस भराचा थकवा जाणवत नाही, क्षणात जातो.

तर हे volcano मुळे तयार झालेले तळे (crater) वरती कडेने चालता येते तसेच खाली असलेल्या नीळ्याशार पाण्या पर्यंत उतरुन खाली जाता येते. वरच्या आकाशाचे पडलेले प्रतिबिंब फारच सुरेख दिसते . सभोवतीच्य तांबड्या मातीच्या वर जाणाऱ्या कडा आणि वर मोकळे आकाश. काठांवर शांत बसून रहवेसे वाटते. आम्ही आमच्या मर्जीचे मालीक होतो कुठेही घाई गडबड न करता मन भरेपर्यंत थांबून आनंद घेत होतो. पुढे जायच्या आधी जेवून मग परत गाडीचा प्रवास.

रस्ते एकेरी असले तरी बीन खड्यांचे होते. बाजूला बघायला नवलाई होती.

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

पुढचे ठिकाण—

Seljalandsfoss Waterfall: Walk behind this majestic waterfall.

हा धबधबा वरुन सरळ खाली कोसळतो.पुढून उजव्या बाजूने आपण छान प्रदक्षिणा घातल्या सारखे त्याच्या पुढून मागे जाउन पुढे येऊ शकतो. थोडे अवघड  आहे पण तिच तर मजा आहे. थंडी हा तर तीथला स्थाई भाव आहे पण अंगात वरुन रेन जॅकेट, रेन पॅंट्स, waterproof gloves ,waterproof shoes असा सगळा जामा नीमा करून जाणेच  योग्य. नाहीतर शक्यच नाही. Fall च्या जवळ जाताच पाण्याचे तुषार अंगावर नाचायलाच लागतात.

2/4 फूट रुंदिची वाट ओलीआणि निसर्डी आहे. पाउल जपूनच टाकावे लागते. तरीही  हा  अनुभव भन्नाट आहे. माझ्या पुढे मागे मयुरेश मुक्ता होतेच नातींना मदतीची गरज नव्हती.

शेवटच्या फोटोत मी धबधब्याचे  पाणि पडतय त्याच्या पुढे 10/12 फूटावर उभी आहे. माझ्या भोवती पूर्ण गोलाकारात दोन ईंद्रधनुष्य होती. आता सांगा हे कधीतरी विसरणे  शक्य आहे का?





# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.





असे तीसर्या  दिवसाचा आनंद घेऊन आम्ही जेवून आमच्या मुक्कामी जायला निघालो. धुवांधार पाऊस वाटेत लागला. अंतर बरेच होते. घरी पोहचे पर्यंत पाऊस थांबला होता. आणि आम्हाला दिसला "पफीन"" छोटा काळा, पांढरा ,पिवळ्या चोचीचा त्यांचा राष्ट्रीय पक्षी. नंतरही तो अधून मधून भेटत राहिला .

**Day 4: Skaftafell & Jokulsarlon Glacier Lagoon (May 28th)**

- Guided hiking on Glacier. And ice cave. It took 3 hours for whole trip. Unique blak glacier.
- हा डोंगर आहे त्याच्या पायथ्यापासून आमच्या hiking ला सुरवात झाली. त्याआधी waterproof shoes च्या खाली  चालायला सोपे व्हावे बर्फा वरुन घसरु नाही  म्हणून microspikes  लावले होते. Volcano शांत झाल्यावर  जी राख पसरते त्यामुळे हे ग्लेशियर काळे आहे. which makes this unique.



# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.



- चढताना उतरताना एका लाईनीत जात असतो. मधे मधे बर्फ वितूळून वहाणारे ओढे लागतात त्यावर लाकडी पूल असतात. या फोटोत पुढे पूल दिसतोय. Maintenance team सतर्क असते. पुला खालचा बर्फ वितळत असतो, तसे झाले तर लगेच त्यावर काम केले जाते. ठिक ठिकाणी चढावर आधारा करता दोरी बांधलेली असते. फोटोत दगडासारखे काळे दिसतय तो सगळा बर्फच आहे.



मी आणि सावनी on the hike

Many ice caves are formed by the erosive action of subglacial river as they flow out from the glacier

Ice caves are not static feachers. They change, especially with the seasons, as meltwater flows change and ice melts and refreezes

This process is particularly active during warmer months.



# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.



मी



मुक्ता



कोण आहे सांगायची गरज नाही. आम्हाला या पेक्षा जास्त मागे जाता आले नाही पण इंद्रधनुष्य सगळे फोटोत आले नाही.

मयुरेश, सलोनी, शैला,मुक्ता,सावनी.



# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

आमची गाईड.

ही दर वर्षी ग्रीस हून येते. तिला हायकिंगची आवड होती. तिने training घेतले. रोज दोन ते तीन ग्रूप घेऊन जाते. 13 वर्ष ती नर्स होती. पण आता इथे आवडीच्या कामात खूश आहे. पूर्ण वेळ माझ्या बरोबर होती.

आम्ही परत आलो आणि जेवायला गेलो.

Iceland मधे जेवणाचे हाल अजिबात झाले नाही खूप महाग पण पोट आणि मन तृप्त व्हायचे.

इथून पुढे आणिक एक fall पहायला जायचे

Skaftafell-

हा आम्ही पाहिलेला तीसरा धबधबा, सरळ खाली पडणारा. त्याच्या पायथ्या पर्यंत जाता येते. वरती उडणार्या थेंबांमधे भिजून चिंब होतो.

दुसर्या फोटो आहे - याच्या बाजूने आपल्याला 537 पायर्या चढून वरती जाता येते .तिथून खाली पडणारे पाणी आणि बाजूचा हिरवा गार परीसर पाहून वर येताना झालेली दमछाक विसरायला होते . सुंदर परीसर पाहून परत तितक्याच पायर्या  उतरायला सुरवात.





असा हा चवथा दिवस मनात साठवून  नवीन मुक्कामी  Vick ला  जाऊन विश्रांती घेतली.

**Day 5: Reykjavik (May 29th)**

.Diamond Beach: Enjoy the unique scenery of icebergs on the black sand.

● Dyrhólaey Arch: Hike to this natural arch with stunning coastal views.

● Reynisfjara Black Sand Beach: Experience the dramatic black sand beach with basalt columns and powerful waves.

आज आम्ही सकाळी आमचा बोरीया बिस्तर आवरुनच या Vick मघल्या टुमदार घरातून बाहेर पडणार होतो.

आमच्या बरोबर मयुरेशचा मित्र अर्शद -कवीता, कवीताची आई आणि मुलगी होते.



Vick हून Reykjavik च्या वाटेवर बर्याच ठिकाणी उतरुन डोळ्यात सामावलेलं एवढा निसर्ग  पहात जात होतो.

लांबवर पसरलेला पांढरा शुभ्र glacier सतत वेगवेगळ्या रुपात दिसत होता.

आता खालचा फोटोत दिसेल पाण्यात पडलेले glacier चे सुरेख प्रतिबिंब

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.





आम्ही Diamond beach ला आलो आणि आमचे नशीब जोरावर होते. स्वच्छ ऊन आणि भरपूर हिमनग ग्लेशियर पासून सुटून समुद्रात जाण्याकरता जणू आमची वाटच बघत होते.

पाण्यातून  वहात येतान हे पांढरे हिमनग नीळे दिसतात. त्यांच्यावर सूर्य प्रकाश पडतो तेंव्हा किरणांमधला निळा रंग सोडून बाकी रंग हिमनगामधे absorb होतात त्यामुळे ते नीळे दिसतात. हळू हळ् पाण्या बाहेरचा हिमनगचा वरचा भाग  सागरात एकरूप होतो . सूर्य प्रकाशात हिऱ्या सारखे चमकतात म्हणून हा Diamond beach









# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.





इथून पाय निघत नव्हता. आम्ही इथून पुढे

Dyrhólaey Arch: Hike to this natural arch with stunning coastal views. पहायला black sand beach वर आलो.









इथून पुढे Reykjavik गाठेपर्यंत चात तासाचा प्रवास होता. पोहचे पर्यंत अकरा वाजत आले होते. सूर्य अजूनही दिसत होता मधेच ढग आले तरी तळपत होता.

उद्या आम्हाला निवांत या राजधानीच्या गावात भटकायचे होत.
Wanted to explore the town.

शांत झोपायची गरज होती.

पुढची भेट. Reykjavik गावात.

# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

**Day 6: Explore Reykjavik.**

या Iceland मधली नावे  उच्चारायला अगदी अवघड. हे राजधानीचे गाव मात्र फारच आनंदी, उत्साही आणि रंगबीरंगी आहे. सगळी कडे परदेशी पाहुणे आरामात हिंडत असतात. इथे इटली सारखी भुरट्या चोरांची भीती नाही.रंगवलेले रस्ते, बाजूला ठिकठिकाणी बसायला जागा,सजवलेली दुकाने, खायच्या जागा, मधेच कुठे बॅण्ड वाजतोय असे सगळे वातावरण छान असते. काम करणारी सगळी माणसे युरोपीयन देशातून आलेली त्यामुळे खाण्याच्या जागांमधे विवीधता होती. जेवणाचे हाल अजिबात झाले नाहित.



सलोनी



सावनी , मयुरेश







# Iceland -कायम लक्षात राहिल अशी ट्रिप.

आम्ही निवांत भटकत होतो. आकर्षक वस्तूंनी सजलेली दुकाने पाहिली. हो नुसती पाहिली window shopping ,पाच मीनीटातच मी वस्तूंच्या किंमती पहाणे सोडले. प्रचंड महाग तसेही घ्यायचे काही नव्हतेच .

नंतर आम्ही इथले चर्च पहायला गेलो.

The "Evangelical- Lutheran church. This is the largest church in Iceland. It towers over the centre of Reykjavík. It is 244 feet tall and houses the largest organ in the country.

चर्चचे वातावरण खूपच प्रसन्न होते. मेणबत्त्या लावलेल्या, क्वायरची प्रॅक्टिस चालू होती. मला पायातले काढल्याशिवाय आत जायला प्रशस्त वाटेना इतके प्रसन्न वातावरण होते.



Church ची उंची लक्षात यायला हा फोटो मस्त आहे. या फोटोकरता आमच्याकडचे मॉडेल अर्शद



चर्चच्या वरती lift ने गेलो की थोड्या थोड्या अंतरावर गोलाकार जागेत झरोके आहेत त्यातून खालचे शहर दिसते. प्रत्येक झरोक्यातून खाली पाहिले तर शहराचा Ariel look बघायला मजा येते.
दिवसभर हिंडून घरी आलो. आज आमचा इथला शेवटचा दिवस होता.आठ दिवस आम्ही नऊजण एकत्र राहिलो,फिरलो. ट्रिपचा मनसोक्त आनंद अनुभवला. अर्शद,कवीता, तीची आई आणि मुलगी झारा. हे कुटुंब व आम्ही .अर्शद सकाळी स्वत:आधी तयार होऊन सगळ्यांकरता ब्रेकफास्ट करायचा, कवीता शेवटी ऊठायची पण खाल्यावर dish washer भरायची हे काही ठरवले नव्हते पण प्रत्येक जण न सांगता मदत करत होते.मयुरेश गाईड होता.ड्रावींगची जवाबदारी मुक्ताने सांभाळली.

कवीताची आई वय 80,कॅालेज मधे प्राध्यापिका होत्या. या वयातही त्या न कुरुकुरता सगळ्यांमधे सहभागी होत होत्या. त्या माझ्या रुम पार्टनर होत्या. त्या दक्षिण भारतातल्या आता एकट्या आहेत मुलीकडे रहातात. आम्हा दोघींच्याही दिमतीला आमची मुलं,नाती अशी एकूण सात जणं होती.

उद्या सगळे आपापल्या घरी परत जाणार त्यामुळे दमलेले आम्ही रात्रीचे जेवण मागवून गप्पात रंगलो.

2 ते 3 दिवस एका घरात (-B & B ) असे तीन घरात राहिलो. अतीशय सुरेख, स्वच्छ, आणि सोयीची घरे होती. 4/5 बेडरुम्स , 3/ 4 बाथरुम्स, एकावेळेस 8/10जणं बसू शकतील एवढे डायनिंग टेबल, सुसज्ज स्वैपाक घर, comfortable beds, towels, dish washer,washer,dryer. अशी रहाण्याची सोय आणि खायचे कोणाचे नखरे नव्हते. कोणाचा कोणाला त्रास नाही, वेळेचा बडगा दाखवणारा trip manager नाही. त्यामुळे ट्रिप लक्षात राहिल अशी झाली.

**दुसर्या दिवशी मी सकाळी व बाकी मंडळी दुपारच्या विमानाने परत जाणार.**








Now I say bye bye Iceland. तरी आठवणी कायम मनात राहतील.

**सौ. शैलजा गोगटे**
**15 जून 25**

Pandurang and Manisha Naik



# दीपतरंग २०२५

# Recipes

# भारताबाहेर राहणाऱ्यांसाठी झटपट भाजणीची चकली

**साहित्य:**

तांदळाचे पीठ - 8 वाट्या

डाळीव - 4 वाट्या

पोहे - 1 पोहे

गरम तेल - 2-3 टेबलस्पून

लाल तिखट - आवडीनुसार

हळद - 1/4 टेबलस्पून

तीळ - 3 टेबलस्पून

ओवा पावडर - 1 टेबलस्पून

जिरे पावडर - 1 टेबलस्पून

चवीनुसार मीठ

गरम पाणी



**कृती -**

- प्रथम पोहे आणि डाळीव कुरकुरीत होईपर्यंत मंद आचेवर भाजून घ्या. तसेच तांदळाचे पीठ देखील थोडे भाजून घ्या. नंतर एका मोठ्या भांड्यात हे सर्व पीठ एकत्र करून त्यामध्ये लाल तिखट, हळद, तीळ, ओवा आणि चवीनुसार मीठ घाला.
- या मिश्रणात 2 ते 3 चमचे कडकडीत गरम तेल घाला आणि चमच्याने नीट मिसळा.
- हळूहळू गरम पाणी घालून पीठ घट्टसर मळून घ्या. पीठ जास्त सैल किंवा जास्त घट्ट नसावे.
- चकलीच्या साच्याला थोडे तेल लावून घ्या आणि तयार पिठाच्या चकल्या पाडा.
- एका कढईत तेल गरम करा. तेल गरम झाल्यावर चकल्या तेलात टाका आणि मध्यम आचेवर सोनेरी आणि खुसखुशीत होईपर्यंत तळून घ्या. चकल्या तेलात टाकल्यावर लगेच चिकटणार नाहीत याची खात्री करा.
- तळलेल्या चकल्या एका जाळीवर काढून थंड होऊ द्या.

**रुपाली साळुंखे**

# दीपतरंग २०२५

# Artworks

## Arnav Kirkire













**Arnav Kirkire**






**Avni Kirkire**







## Pritika Naikwade



## Arav Khedkar







## Arav Khedkar









**Sharvari Kulkarni**



**Bhargavi Jumde**



## Evannie Soman



**Manaswi Bansod**



Manaswi Bansod

